वृक्ष वगैरे समुदाय (संभार) आणि जीवजंतू (कीडेकीटक) असंख्य निर्माण करून परमेश्वराला पश्चाताप (सखेद) युक्त आश्चर्य वाटले आणि आपले कर्तृत्त्व अर्थहीन (लीला निःसार) वाटले, "मी हा ब्रह्मांडाचा विस्तार केला. त्यात चंद्र, सूर्य व तारांगणांचा भार (समूह) निर्मिला. या कौतुकाचा किंचितही (लवभर) विचार कोणीच करत नाही. हा सर्व खेळ करण्यात माझ्या जगदीशाचा काय हेतू असेल याचे निश्चयपूर्वक ज्ञान कोणत्याही प्राण्याला (जंतू) नाही. ज्याला दुसरी जोड नाही अशी (अतुल) ही माझी ऐश्वर्यसंपन्नता (वैभवसमृद्धि) जाणेल असा कुशाग्र (तीव्र) बुद्धीचा प्राणी जोपर्यंत निर्मिला नाही तोपर्यंत (तद्+अवधि) माझे हे कार्य खरोखरच (त्रिशुद्धि) निरर्थक (विफळ) आहे" असे जाणून जगदीशाने (परमेश्वराने) मनुष्यरूपाचा प्राणी निर्माण केला की, "जो सारासार बुद्धीमुळे माझे सामर्थ्य जाणील. माझे अगाध वैभव, माझी अपूर्व शक्ती तसेच हा सर्व मायेचा खेळ आहे हे सर्व तो आश्चर्यपूर्वक जाणेल. तोच ज्ञान संपादन करेल, माझे चिंतन व ध्यान (अवलोकन) करेल, तोच आश्चर्यचकित होईल आणि तेव्हाच (तैं) माझा खेळ पूर्ण होईल. प्रेक्षकांची जी आनंदसंपन्नता तीच माझ्या खेळाची मला संपन्नता (पूर्णता) असेल. माझे जगाचे शासन करण्याचे कौशल्य (जगत्+नियंतृता) पाहून नर माझे कार्य पूर्ण झाले (कृतार्थ) असे मानेल." (ओ. ५१-६२)

काम्यकर्मे (मनाला आनंद देणारी कर्मे) करणे व द्रव्योपार्जन करणे (पैसा कमविणे) यासाठीच शरीराचे पोषण (सुदृढ ठेवणे) करावयाचे नसते, तर जोपर्यंत जीवात जीवन आहे (यावत्+जीव) तोपर्यंत ब्रह्मज्ञान (तत्त्वज्ञान) संपादन करणे यातच आयुष्याची साफल्यता आहे. तत्त्व म्हणजेच अभेदज्ञान (जीव व परमेश्वर एकच आहे असे ज्ञान) त्यालाच उपनिषदात ब्रह्मज्ञान म्हणतात. परमात्म्याची उपासना ती हीच आणि भक्तांचा भगवान म्हणतात तोही हाच. गुरु आणि ब्रह्म हे दोन (वेगळे) नाहीत असे जे एकात्माचे (अभेद) ज्ञान ते झाले आणि अशीच भक्ती घडली म्हणजे मायातरण (ईश्वराची मोह घालणारी शक्ती पार करून जाणे) अगदी सोपे होते. जे श्रद्धावंत योग्य पुरुष, ज्ञान आणि वैराग्य प्राप्त करून आत्मानंदात (आत्मस्वरूपात) निमग्न होतात (आत्मतत्त्वचि निजभोग्य), ते भक्त भाग्यवान समजावेत. आपल्या खऱ्या स्वरूपाचे (आपण व परमेश्वर एकच आहोत याचे) भान नसणे हे जे अज्ञान ते निरसल्याशिवाय स्वतःला कृतार्थ मानणे हे एक विलक्षण विघ्न (प्रतिबंध) आहे. ज्ञान आणि अज्ञान या दोन्ही मनोवृत्ती (विकार) अविद्या (मोह) उत्पन्न करण्याला कारणीभूत होतात. काट्याने काटा काढून दोन्ही (ज्ञान व अज्ञान) उडवून द्या. ज्ञानाने अज्ञान दूर करा. ज्ञान व अज्ञान यांचे पलीकडे (अतीत) जाऊन स्वस्वरूपात लीन होणे (अवस्थान) हेच नरजन्माचे एक अंतिम ध्येय (पर्यावसान) आहे. जोपर्यंत विषयप्रीतीरूपी तेलाची

(स्नेहाची) रांगोळी (पूड) केली जात नाही, अज्ञानरूपी अंध:काराची (तमाची) काजळी (राख) केली जात नाही, 'मी मम' (मी व माझे) या वातीची होळी (पेटवून समाप्त करणे) केली जात नाही, तोपर्यंत ज्ञान आपले तेज प्रज्वलित करीत नसते (न पाजळी निजप्रभा). नरदेहात जे जे कार्य (कर्म) मग टाळण्यासारखे असो वा नसो (निवार्य वा अनिवार्य) ते नर बुद्धिपुर:सर संकल्प किंवा बेत करूनच (निश्चयप्राय) केलेले असते हे जाणावे. आपणाला दुसरे काही काम नसले तर स्वस्थपणे ऐश्वर्य व आराम भोगावा, अथवा रामनामाचे चिंतन (स्मरण) करावे आणि निश्चिंत (चिंतारहित) व निष्काम (इच्छाविरहित) व्हावे. शरीराची इंद्रिये, मन व बुद्धी या तर आत्म्याच्या उपाधी (एखाद्या पदार्थाला आपल्या खऱ्या रूपापासून वेगळी करून दाखविणारी वस्तू उदा. घटाकाशाबाबतीत घट किंवा घडा ही आकाशाची उपाधी आहे.) आहेत. त्यामुळे आत्मा स्वत: अनादि (जन्मरहित) व अभोक्ता (भोग न भोगणारा) असून कर्माच्या भोक्तृत्त्वाचे संकट अंगावर ओढून घेतो (आपादी). आत्म्याच्या भोक्तृत्त्व (भोग भोगणे) हे (आपल्या) उपाधीमुळे (औपाधिक) असते. (मूळ) स्वाभाविकपणे तो अभोक्ता असतो. यासाठी न्यायशास्त्रात (हिंदूंच्या दर्शनांपैकी गौतमप्रणीत तत्त्वज्ञान) अन्वय-व्यतिरेक (अस्तिव्व दाखवून व अभाव दाखवून प्रतिपादन केलेले) प्रमाण (पुरावे) आहेत ते पहा (देखा). हे एक आपले रहस्य (वर्म) जाणून वाटच्यास येईल ते कर्म (प्राप्तकर्म) बुद्धीला सोपावे, मनाचे कामकाजही (धर्मही) तिचे हाती सोपावे आणि स्वत: निष्कर्मी वर्तावे (जणूकाय आपण काही करतच नाही असे वागावे). स्वत:च्या वर्णाच्या (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र) व आश्रमाच्या (ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ किंवा संन्यास) कर्तव्याप्रमाणे सर्व विधि व आचरण (अनुष्ठान) पाळावेत. सदा आत्मा (परब्रह्म किंवा परमेश्वर) म्हणजे काय व अनात्मा (परमेश्वराशिवाय इतर सर्व पदार्थ) म्हणजे काय याचा विचार (मनन) करावा. हेच नरदेहाचे अंतिम साध्य (पर्यावसान) आहे. आत्मस्वरूपात रममाण झाले म्हणजेच (मनाला) सुख (समाधान) लाभते. चारी पुरुषार्थ (धर्म, अर्थ, काम व मोक्ष) साधण्यासाठी नरदेहाशिवाय आणखी दुसरे (आन) साधन नाही. जो मनुष्य अभ्यास करण्यास तत्पर असतो त्याला श्रीविष्णूची योग्यता (नारायणपद) प्राप्त होते. म्हणून जोवर देह पडला नाही तोवर आत्मज्ञान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करा. नरजन्माचा एकही क्षण उपेक्षून टाकू (फुकट घालवू) नका. (ओ. ६३-७८)

समुद्रातले खारट पाणी (क्षार) ढगांच्या (मेघा) हाती पडले की त्याचे जसे गोड पाणी (पीयूख) होते, तसेच आपण गुरुचरण धरले की आपल्या दु:खांचे सुख होऊन जाते. अशा नरदेहाची सद्गति (मरणोत्तर चांगली दशा) गुरुशिवाय कोणाकडेही कळणार नाही. गुरुच जेव्हा हाती धरतात तेव्हाच मंद बुद्धीच्या लोकांचा (जड जीवांचा)

उद्धार होतो. मंत्र, तीर्थक्षेत्र, देव, ब्राह्मण (द्विज), ज्योतिषी (ज्योतिर्विद्), वैद्य (भेषज) आणि सातवे गुरुराज या सर्वांच्या ठिकाणी भावना (श्रद्धा) कामास (काज) येते. ज्या ठिकाणी जशी श्रद्धा (निष्ठा) त्याप्रमाणे यश (सिद्धी) प्राप्त होते. श्रद्धेची तीव्रता (वेग) जशी कमी किंवा अधिक त्याप्रमाणे फलही (सिद्धीही) तितकेच. संतलोक बद्धाला (संसारातील मायेच्या व जन्ममरणांच्या बंधनात गुरफटलेल्याला) मुमुक्षु (संसारातील जन्ममरणरूपी बंधनातून सुटण्याची दृढ बुद्धी असणारा आणि मोक्षाची इच्चा करणारा) बनवितात आणि मुमुक्षुला मुक्त करतात. (जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सोडवितात आणि मोक्ष प्राप्त करवून देतात). संत स्वत: अव्यक्त असून (आकाररूप नसताना) व्यक्त होऊन (अवतार घेऊन) परोपकारासाठी हे काम करतात. व्याख्याने देऊन किंवा पुराणे लिहून जे कार्य होत नाही ते सत्पुरुषांच्या नुसत्या आचरणांनी सहज सिद्ध होते. संतांचे हालणे चालणे वागणें हाच जणूकाय बोलल्याशिवायचाँ (नि:शब्द) उपदेश असतो. क्षमा, शांती नि:संगता (सोबती किंवा संबंधी पासून दूर राहणे किंवा इच्छा व मायापासून मुक्त असणे), भूतदया (सर्व प्राण्यांवर दया दाखविणे), परोपकारता, इंद्रियनिग्रह (विषय भोगण्याच्या साधनांचे दमन करणे) आणि निरहंकारता (अहंकार नसणे, नम्रता असणे) या सर्व गोष्टी आचरणात आणणारा माणूस क्वचितच (दुर्लभ) सापडतो. जे पुस्तके वाचून प्राप्त होत नाही ते एखाद्या व्यक्तीचे आचरण (वागणे) पाहून प्राप्त होते. असंख्य (अनंत) ताऱ्यांचे समूह (गण) जे करू शकत नाहीत ते काम सूर्य (भास्वत) एकटा करतो. तसेच हे थोर मनाचे (उदार) संत! त्यांच्या सहज क्रिया अनंत जीवांना बंधमुक्त करून अत्यंत सुख देतात. (ओ. ७९-८७)

यातीलच साईमहाराज हे एक ऐश्वर्ययुक्त, श्रीमंत व श्रेष्ठ संत (महंत) होते. परंतु त्यांची वागणूक (आचरित) एखाद्या फकीरासारखी होती. ते सर्वदा आत्मानंदात रंगलेले (आत्मनिरत) असत. ज्यांचे सर्वांशी समदृष्टीने वागणे सतत काय (अनवछिन्न) होते, ज्यांचेकडे मी व माझे ही गोष्ट (वार्ता) नव्हती. जीवमात्री सदा दयाळूपणा होता. आणि सर्व प्राण्यांत मूर्तिमंत भगवानच ते पाहत होते. ज्यांना सुख मिळाल्यावर हर्ष (हरिख) होत नसे व दु:ख प्राप्त झाल्यावर जे शोक करीत नसत, ज्यांना राव (श्रीमंत) व रंक (भिकारी) एकसारखेच वाटत असत, अशा त्यांचे कौतुक काय साधेसुधे (सामान्य) होते? ज्याचा नुसती भुंवई वाकडी करून केलेला इशारा (भ्रू+विक्षेप+लहरी) एका क्षणात रंकाचा (भिकाऱ्याचा) राव (लक्ष्मीवान श्रीमंत) करू शकत असे तो हा खांद्यावर चौपालवी (चौपदरी भिक्षेची झोळी) घेऊन दारोदारी हिंडत असे. बाबा भिक्षेकरी (भिक्षा मागणारे) होऊन "पोरी आण गे चतकुर (एक चतुर्थांश) भाकरी" असे म्हणून ज्यांचे दारी येऊन हात पसरत ते लोक धन्य होत. एका हातात टमरेल (पीण्याचे भांडे Tumbler) घेऊन व दुसऱ्या हातात चौपदरी

(फडक्याची चार टोके एकत्र करून केलेली भिक्षेसाठी बनविलेली झोळी) घेऊन स्वत: दररोज ठरलेल्या (नियमित) घरी फिरत असत. भाजी, सांबारे (कालवण किंवा भात इ. कालवून खाण्याचा पातळ पदार्थ), दूध, ताक वगैरे सगळे पदार्थ लोक एकाच ठिकाणी टमरेलात ओतत असत. काय हो पहा हे खाण्याचे कौतुक! शिजलेला भात किंवा भाकरी यांसाठी चौपदरी (झोळी) पसरत असत आणि मग पातळ पदार्थ कशाही प्रकारे टमरेलात ओतून घेत असत. पदार्था-पदार्थांची (वेगळी) चव घेण्याची लालसा (तीव्र इच्छा) तरी कशी व्हावी? स्वाद (चव) घेण्याचा लोभ जीभेलाच ठाऊक नाही (न ठावे) तर तो मनात (जीवी) कोठून उठेल? (योगायोगाने) आपोआप (यदृच्छेने) जे झोळीत पडेल तेच खाऊन तृप्त (संतुष्ट) असावे. ते स्वादिष्ट (रुचकर) की स्वादरहित (बेचव) याचा विचारच नाही. (जीभेला) चव घेण्याची हौसच नाही मुळी. दिवसा प्रहरी गावातून दररोज भिक्षा मागून आणून उदरनिर्वाह करून ते समाधानाने राहात असत. भिक्षा तरी काय नियमित (ठरलेल्या वेळी) होती? मनात येईल तेव्हा मागत. कधी एका दिवसात बारा वेळाही गावात भिक्षेसाठी जात असत. अशाप्रकारे जे अन्न आणीत ते मशिदीतील कुंडीत (दगडाचे किंवा मातीचे पसरट तोंडाचे भांडे) ठेवीत. त्यांतच कावळे, कुत्रेही येऊन खात. परंतु त्यांना ते कधीच हाकलून लावीत नसत. मशिद व आंगण (पुढची मोकळी जागा) झाडणारीसुद्धा त्यातून दहाबारा भाकरी आपल्या घरी घेऊन जात असे. परंतु तिला कोणी मज्जाव (प्रतिबंध) करीत नसे (न वारी). कुत्र्या मांजरांना हडहड करणे (तिरस्काराने हाकलून देणे) ज्याला स्वप्नात ठाऊक नव्हते तो काय गरीब दुबळ्यांना नको म्हणेल काय? (खरोखरच) बाबांचे जीवित (जिणे) धन्य होते. सुरुवातीला 'वेडा फकीर' याच नावाने लोकात ते मशहूर (प्रसिद्ध) होते. (भाकरीचे) तुकडे मागून जो पोट भरेल त्याचा बडेजाव (बडिवार) तो कोठला? तो फकीर (भीक मागणारा) परंतु हाताचा सढळ (पैसे वाटण्यात उदार) होता. तो निरपेक्ष (कोणाचीही गरज नसणारा) परंतु स्नेहाळ (प्रेमळ) होता. बाहेरून चंचळ परंतु आतून (अंतरी) अगदी शांत (अचळ) वृत्तीचा होता. अशी त्याची न समजणारी (अकळ) कळा (चतुराई) होती. (ओ. ८८-१०४)

अशा या कुग्रामात (आडबाजूच्या खेड्यात) काही लोक मूळातच दयाळू अंत:करणाचे होते, जे त्यांना महंत (श्रेष्ठ दर्जाचे साधू) मानीत असत. तात्या कोते पाटील यांची आई जिचे नाव बायजाबाई होते ती डोक्यावर (डोई) टोपलीत (पाटीत) भाकऱ्या घेऊन दुपारी रानात जात असे, कोस कोस (मैलोगणती) रान शोधत असे (धुंडावे), दाट झाले झुडपे तुडवीत असे आणि या वेड्या फकीराला शोधून काढून त्याच्या पाया पडत असे. तिच्या चांगूलपणाची (सत्त्वाची) किती थोरवी! दुपारीतिपारी रानावनात जाऊन ओलीकोरडी भाजीभाकरीची न्याहारी ती बाबांना भरवीत असे.

अशी तिची तपश्चर्या बाबासुद्धा शेवटपर्यंत (आमरणान्त) विसरले नाहीत. पूर्ण आठवण ठेवून तिच्या मुलाचे त्यांनी कल्याण केले. या उभयता स्त्रीपुरुषांची (बायजाबाई आणि तिच्या नवऱ्याची) फकीराच्या (बाबांच्या) ठिकाणी खरी दृढ भक्ती (दृढ भाव साचा) होती. फकीरच त्या दोघांचा देव होता. अहो! देव खरा भक्तांचाच (भावार्थियांचाच) नाही का? फकीराने ध्यानस्थ बसलेले असावे. बायजाबाईने पान मांडून त्यावर टोपलीतले अन्न वाढावे आणि प्रयत्न करून त्याला खाऊ घालावे. बाबा सदा म्हणत, "फकीरीच खरी (अव्वल) राजेशाही (बादशाही) असते. फकीरीच कायमची (चिरंतन) राहते. श्रीमंती (अमीरी) पहा क्षणात नाश पावते." पुढे बाबांनी रान सोडले व गावात येऊन राहू लागले. मशिदीत अन्न खायला सुरुवात केली व आईचे (बायजाबाईचे) कष्ट वाचविले. असा हा जो नेम तेव्हापासून त्या दोघांनी चालविला तो तसाच त्यांचे मागून (त्यांच्या मुलांने) तात्यानेंहि चालविला होता. (ओ. १०५-११४)

संत खरोखरीच धन्य होत की ज्यांचे हृदयांत सदा वासुदेव (परमेश्वर) असतो. (वासुदेवाचेच चिंतन करीत असतात). तसेच त्या भक्तांचे भाग्यही धन्य की ज्यांना त्या संतांच्या समागमाचे ऐश्वर्य प्राप्त झालेले असते. तात्या कोते पाटील महा भाग्यवान आणि म्हाळसापतीचेही पुण्य थोर की बाबांच्या सहवासाचा मान दोघेही एकसारखा (समसमान) भोगीत होते. तात्या आणि म्हाळसापती मशिदीत झोपत असत (शयन करिती) त्या दोघांवर बाबांचे अनुपम (ज्याला दुसरी उपमा नाही असे) व सारखे प्रेम होते. पूर्व, पश्चिम व उत्तर अशा तीन दिशांना तिघांची तीन डोकी (डोया) असावयाची व पाय एकमेकांचे पायाला मध्यबिंदूला भिडविलेले (जोडलेले) असावयाचे. असे बिछाने (पथाऱ्या) पसरून सर्व गोष्टी गप्पा चालावयाच्या. एखाद्याला झोपेची डुलकी आली तर दुसऱ्याने त्याला जागवावे. तात्या घोरू लागला की त्याला बाबांनी अवचित उठवावे व उलथापालथा करून त्याचे डोके दाबून धरावे. म्हाळसापतीला बरोबर (समवेत) घेऊन दोघांनी त्याला (तात्याला) आवळून धरावे, त्याचे पाय दाबावे आणि पाठही रगडावी. अशी संबंध चौदा वर्षे तात्या मशिदीत बाबांबरोबर झोपले (निजले). किती भाग्याचे ते दिवस? त्यांची आठवण त्यांना सतत (अखंड) राहिली. आई-बाप घरी ठेवून बाबांच्या प्रेमामुळे (आवडी) ते मशिदीत झोपत असत. ते प्रेम कोणत्या मापाने मोजावे? त्या प्रेमाची किंमत (मोल) कोणी करावी? पुढे वडील पंचत्व पावले (वारले) व तात्या घरसंसारात पडले, स्वत: घरातील कर्ता पुरुष (घरधनी) व बायकोते पती (दादुले) झाले आणि आपल्या घरी (निजगृही) झोपू लागले. असो. ज्याची अशी खात्रीयुक्त भावना (निष्ठावंत भाव) असेल त्यालाच साईबाबांचा अनुभव न मागताच (अनाहूत) येऊन उभा राहतो व भक्ताला चमत्कार

(नवलाव) दिसतो. (ओ. ११५-१२५)

तसेच रहात्यातील खुशालचंद नावाचे एक श्रीमंत व गावचे नगरशेट (मोठे सावकार किंवा व्यापारी) गृहस्थ बाबांचे भक्त होते. जसे प्रख्यात गणपत कोते पाटील (तात्यांचे वडील) बाबांचे फार आवडते होते तसेच खुशालचंदाचे चुलते (वडिलांचे बंधू चंद्रभानशेट) बाबांचे फार लाडके (बहु प्रिय) होते. जातीने जरी ते मारवाडी (मारवाड देशात म्हणजे हल्लीच्या राजस्थानात राहणारे, धूर्त व कावेबाज व्यापारी) होते तरी बाबांकडे त्यांचा फार ओढा (आवडी) होता. एकमेकांच्या अत्यंत सुखदायक (सुखपरवडी) भेटी ते घडोघडी (वारंवार) घेत असत. ईश्वरेच्छेने (हरीच्छेने) घराण्यातील वडील शेटजी चंद्रभानशेट (१९११ साली) मरण पावले, तरीही बाबा त्या घराण्याला विसरले नाहीत. उलट त्यांचे प्रेम दुणावले (दुप्पट झाले). पुढेदेखील खुशालचंदावर (त्यांच्या पुतण्यावर) बाबांची प्रीती वाढत गेली आणि देह असे तो (आमरणान्त) दिवसरात्र त्यांच्या कल्याणाकरिता ते जागृत राहिले. कधी बैलगाडीत (गो+रथीं) तर कधी घोडागाडीत (हय+रथीं) प्रेमळ सोबती (सांगाती) बरोबर घेऊन शिरडीपासून दीड मैलावर (सुमारे तीन किलो मीटरांवर) रहात्या गावी बाबा जात असत. गावकरी लोक तासे वाजंत्रीसह सामोरे येऊन बाबांना गावाच्या सीमेवर (वेशीवर) येऊन भेटत व प्रेमाने लोटांगणे घालीत (साष्टांग नमस्कार करत असत). मग तेथून उत्सव सोहळ्याने (समारंभे) वाजत गाजत आनंदभरित मनाने व प्रेमभक्तीने गावात घेऊन जात असत. नंतर खुशालचंद बाबांना आपल्या घरी घेऊन जाऊन थोडा फराळ करवून आरामशीर बैठकीवर (सुखासनी) बसवीत असत. मग ते दोघे जुन्या पुराण्या गोष्टी आठवून एकमेकांना सांगत व त्यामुळे त्यांना जो आनंद होत असे तो कोणी वर्णन करावा? अशाप्रकारे मौजेचा फेरफटका (आनंद-विहार) व फराळ (फळ+आहार) पूर्ण झाल्यावर बाबा मग आत्मानंदाने परिपूर्ण होऊन (स्वानंद+निर्भर) सोबत्यांबरोबर शिरडीला परत येत असत. (ओ. १२६-१३६)

एकीकडे हे रहाते गाव होते व दुसरीकडे ते निमगाव होते. (जेथे बाबासाहेब डेंगळ्यांचे घरी बाबांची फेरी असे. पहा अ. ५/७६-७७). या दोन्हीच्या मध्ये बाबांच्या राहण्याचा (वस्तीचा) शिरडी गाव होते. या मध्यबिंदूपासून या दोन गावांपलीकडे ते स्थूल देहाने (जड देहाने) देहत्यागापर्यंत (आनिर्वाण) कधी गेले नाहीत, तरी त्यांना सर्व ठिकाणांची माहिती (जाण) होती. इतर कोठे जाणे (प्रयाण) नाही, रेलगाडीचे (अग्निरथाचे) दर्शन नाही, तरी त्या गाडीचे येणेजाणे व वेळापत्रक त्यांना ठाऊक असे. त्या गाडीची वेळ साधण्याकरिता भक्तांनी मोठी (प्रबळ) तयारी करावी (परंतु) बाबांजवळ आज्ञा मागण्याकरिता जाता त्यांनी म्हणावे, "आत्ता घाई (उतावळ) का

करता?'' (त्यावर भक्त उत्तर देत), ''बाबा! आत्ता घाई केली नाही तर माझी मुंबईची गाडी चुकेल, नोकरीवर धाड पडेल आणि साहेब मला काढेल ना.'' (मग बाबा म्हणत), ''येथे साहेब दुसरा कोणी नाही (फकीरभाईच साहेब). इतकी पळापळी कशासाठी? जा जरा भाकरतुकडा खा आणि दुपारी जेऊन निघा.'' अशी कोणाची प्राज्ञा (हिम्मत) की जो या शब्दांची अवज्ञा (अनादर) करेल? लहान, मोठ्या, शहाण्या व समजूतदार (सूज्ञ) सर्व लोकांना याचा अनुभव होता. ज्याने ज्याने आज्ञा मानली त्याची गाडी कधीच चुकली नाही. परंतु ज्याने ती मानली नाही त्याने हातोहात (लगेच) अनुभव घेतला (प्रचीती घेतली रोकडी). (ओ. १३७-१४४)

एकामागून एक असे अनेक लोकांचे नविन नविन व आश्चर्यकारक असंख्य अनुभव मी संक्षेपपूर्वक (थोडक्यांत) सांगेन. हेमाड साईचरणी शरण आलेला आहे. पुढील अध्यायात याच गोष्टीचे वर्णन होईल. आपल्या गावी परत फिरण्यास बाबांचे आज्ञापन (अनुमोदन) लागे. आज्ञा होई तो तो जाई. आज्ञा नाही तो तो मागे राही. जो ती अवमानी (मानत नसे) तो संकटात (अपायी) पडत असे. पुढील अध्यायात याबद्दलच थोडेसे सांगणे (दिग्दर्शन) होईल. तसेच बाबांचे माधुकरी वृत्तीचा (भुंगा जसा फुलाफुलांतून थोडा थोडा मध आणतो त्याप्रमाणे दारोदार भिक्षा मागून आणलेल्या अन्नावर उपजीविका करणे) अंगीकार (अवलंबन) करणे आणि अशाप्रकारे भिक्षा मागून आणलेले अन्न खाणे (भिक्षा+अन्न+सेवन) कशासाठी आणि पंचसूना वगैरे पातकांचे धुतले जाणे (क्षालन) म्हणजे काय या गोष्टी पुढे सांगितल्या जातील. म्हणून श्रोत्यांच्या चरणी क्षणोक्षणी आग्रहाने विनंती करतो की त्यांनी आपल्या कल्याणाकरितां (हे) साईचरित्र ऐकावे. (ओ. १४५-१४९)

सर्वांचे कल्याण असो. अशाप्रकारे संत व सज्जन यांनी प्रेरणा केलेल्या भक्त हेमाडपंत यांनी रचलेल्या श्री साईसमर्थ यांच्या सत्यचरित्राचा ''नरजन्म-महिमानं, भिक्षान्नसेवनं, बायजाबाई-भक्ति-वर्णनं तथा तात्याम्हाळसापति-मशूधी शयनं'' (नरजन्माचा महिमा, बाबांचे भिक्षा मागून खाणे, बायजाबाईच्या भक्तीचे वर्णन आणि तात्या कोते पाटील व म्हाळसापती यांचे बाबांबरोबर मशिदीत झोपणे) या नावाचा आठवा अध्याय समाप्त झाला.

**श्री सद्गुरु साईनाथांना अर्पण असो. सर्व मंगल असो.**

# श्री दासगणूमहाराज व्यक्ति आणि वाङ्मय

(श्री साईलीला, जुलै १९५६ अंकावरुन)

लेखक–प्राचार्य शं. वा. दांडेकर

तेंहि प्राणापरौतें।
आवडती हें निरुते।
जे भक्तचरित्रातें।
प्रशंसती ।।

ज्ञा. अ. १२-२२७

('आधुनिक महिपति' म्हणून उभा महाराष्ट्र ज्यांना ओळखतो त्या श्रीदासगणू-महाराजांच्या चरित्राची व वाङ्मयाची ओळख करून देणारें पावणेसहाशें पानांचें 'संतकवि श्रीदासगणूमहाराज-व्यक्ति व वाङ्मय' हें पुस्तक लिहून आयुर्विद्या पारंगत श्री. अनंतराव आठवले यांनीं संतवाङ्मयविषयक व चरित्रविषयक ग्रंथांत एका उत्कृष्ट ग्रंथाची भर घातली आहे यांत शंका नाहीं व त्याबद्दल त्यांचें मन:पूर्वक अभिनंदन करणें अवश्य आहे.)

गणित, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादि शास्त्रीय विषयांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिण्यापेक्षां एका दृष्टीनें चरित्र-मग तें 'आत्मचरित्र असो अथवा दुसऱ्याचें असो' लिहिणें सोपें वाटतें हें खरें आहे. पण त्यालासुद्धां एका विशिष्ट प्रकारच्या मनोरचनेची व साहित्याची गरज असल्यानें चरित्र लिहिणें हे सुद्धां नाजुक व अवघड असें काम आहे.

ज्या थोर पुरुषांचीं चरित्रें लिहिलीं जातात त्यांमध्यें आपली माहिती स्वत:च देणारे फारच थोडे असतात. जे कांही थोडे माहिती देतात ते आपल्या आयुष्यांतील कांहीं घटनांचा प्रसंगोपात्त कोठेंतरी उल्लेख करतात. पण त्यांनीं अशा सांगितलेल्या फुटकळ माहितीबद्दल त्या घटना कां, कशा, कोठें व केव्हां घडल्या ह्यांचा विचार

करून एक सुसंगत अशी गोष्ट तयार करून एक संपूर्ण जीवनचरित्र तयार करणें हे एक अवघड काम होऊन बसतें, कारण, जे फार मोठे लेखक आहेत त्यांना जगाला जो संदेश द्यावयाचा असतो त्यांतच ते इतके विरून गेलेले असतात कीं त्यांना आपल्या स्वतःच्या वागणुकींतील सुसंगता दाखविण्यास फुरसतच नसते. ज्या अतिशय मोठ्या व्यक्ति आहेत त्यांच्यांत तर ती दाखवावी अशी वृत्तीच नसते, ह्यामुळें त्यांच्या जवळ बरींच वर्षें राहणारा चरित्रलेखक लाभला तरच त्यांचें चरित्र जगाच्या पुढें सुसंगतपणें येण्याचा संभव असतो.

पण खरे सांगावयाचें तर नुसता मोठ्या लोकांच्या जवळ बरींच वर्षें राहणारा असा नुसता मनुष्य मिळूनहि खरें चरित्र जगास मिळेलच असें नाहीं. कारण, थोर पुरुषाच्या जवळ राहणाऱ्या सर्वांनाच त्याच्या थोरवीची खरी किंमत कशांत आहे हें ठाऊक असतेंच असें नाहीं. उदाहरणार्थ म्हणून मी पुढील गोष्ट सांगतों. त्या योगानें माझ्या वरील म्हणण्याचा अभिप्राय वाचकांच्या लक्षांत येईल.

माझे गुरुजी कै. जोग महाराज ह्यांना पीनस होता. त्यामुळें ते तपकीर ओढत असत. ते वैकुंठवासी झाल्यानंतर एका त्यांच्या भक्ताची व माझी गांठ पडली व त्यांनीं माझ्यापुढें ओढण्याकरितां तपकिरीची डबी केली. त्यावर मीं सांगितलें. 'मी तपकीर ओढत नाहीं.' तेव्हां तो मनुष्य माझ्याकडे आश्चर्यानें बघूं लागला, व मला म्हणाला, "काय, तुम्ही जोगमहाराजांचे शिष्य आणि तपकीर ओढत नाही?" वाचकांच्या लक्षांत आलें असेल कीं मला भेटलेल्या या भक्ताच्या दृष्टीनें जोगमहाराजांच्या जीवनांत ज्ञानेश्वरी, अनुभवामृत ह्यांना जितकें स्थान तितकेंच तपकीर ओढण्यासहि असावें. ह्याचा अर्थ असा कीं मोठ्या मनुष्याच्या जवळ राहूनसुद्धां मोठ्या मनुष्याचा मोठेपणा कशांत आहे हें सर्वांनाच कळतें असें नाही. म्हणून तुकारामबुवांनींसुद्धां उपरोधयुक्त विनोदानें म्हटलें आहे कीं "**संत संगतीं न करावा वास। एखादा गुणदोष येईल अंगा।।**"

थोर पुरुषाचें चरित्रलेखक होण्यास त्यांच्याजवळ राहण्याचें भाग्य लागतें. एवढेंच नव्हे तर त्यांची योग्यता जाणण्याची चरित्रलेखकाच्या अंगीं पात्रताहि लागते हें खरें. पण एवढ्यानेंहि काम भागत नाहीं. आणखी दोन तीन गुणांची ह्या गोष्टीस जोड लागते. त्यांतील पहिला गुण असा कीं जवळ राहणाऱ्या मनुष्यास ह्यांचें चरित्र आपणांस कळावें अशी तळमळ लागते. तसेंच तें आपण लोकांस सांगावें अशी इच्छा लागते. ह्यांच्या अभावीं तो जवळ असून व अंगीं जाणण्याची पात्रता असूनसुद्धां व त्या थोर पुरुषाच्या आयुष्यांतील घटना त्यांच्या डोळ्यादेखत घडत असूनसुद्धां तो त्यासंबंधी स्वतः विचार करणार नाहीं अथवा त्या थोर पुरुषांसहि विचारणार नाहीं. मग त्या

आठवणींत ठेवून, लिहून काढून लोकांच्या समोर मांडायची गोष्ट विचारावयास नको.

चरित्रलेखकांत वरील प्रकारची तळमळ व इच्छा असूनहि भागत नाहीं. त्याची वृत्ति साक्षेपी लागते. कारण थोर पुरुषांच्या चरित्रांतील नमूद करण्यासारख्या घटना ज्या स्थळीं व ज्या कालीं घडत राहतील त्या स्थळीं व त्या कालीं सर्वच प्रसंगी लेखक जातीनें हजर राहू शकेलच असें नाहीं. उदाहरणार्थ, थोर पुरुषांचा जन्मकाल अथवा लहानपण ह्याविषयींची माहिती चरित्रलेखकास सामान्यत: दुसऱ्याकडूनच गोळा करावी लागते. चरित्र-नायकापेक्षां वयानें मोठे व नात्यानें जवळचे असे चरित्रलेखक मिळणें अत्यंत दुर्लभ आहे, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. चरित्र-नायक प्रसिद्धीला येण्याच्या पूर्वीच्या लहानसहान गोष्टींची दखल कोण ठेवणार? कारण, त्यांची गरज तरी का भासलेली असणार? यामुळें चरित्र-लेखकांस त्या थोर पुरुषांचा ज्यांच्याशीं संबंध आला त्यांच्या गांठी घेऊन माहिती मिळविणें आवश्यक असतें. पण हें काम अत्यंत अवघड असें आहे. कारण अशीं माहिती देणारीं माणसें मिळणें जरूर आहे. मिळाल्यास, त्यांना मागच्या गोटींची स्मृति असणें कठीण. स्मृति असूनसुद्धां त्यांत आत्मश्लाघा न येतां जशी घटना घडली असेल तसें सांगण्याचें सत्यावरील प्रेम त्यांच्यांत असणें जरूर आहे. यामुळें हें काम फारच अवघड होऊन बसतें.

तात्पर्य (१) चरित्रलेखकाला चरित्र-नायकाचा बहुतकाल सहवास घडण्याचें सुभाग्य असणें, (२) त्याला चरित्र-नायकाची योग्यता कळण्याची पात्रता असणें, (३) चरित्र कळावें अशी तळमळ असणें, (४) तें लोकांना सांगण्याची इच्छा असणें, (५) व इतरांकडून माहिती गोळा करण्याकरितां करावे लागणारे कष्ट सहन करण्याचें अंगी धैर्य व उत्साह असणें-ह्या गोष्टी चरित्र लेखकाकडून उत्कृष्ट चरित्रलेखन होण्यास आवश्यक असतात.

जगांतील उत्कृष्ट चरित्रग्रंथांमध्यें आंग्ल-साहित्यिक डॉ. जॉन्सन् ह्यांचे बॉस्वेलनें लिहिलेलें चरित्र मोडतें. त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत बॉस्वेलनें आपलें एतद्विषयक भाग्य वर्णन करितांना पुढील प्रमाणें उद्गार काढले आहेत. 'As I had the honour and happiness of enjoying his friendship for upwards of twenty years; as I had the scheme of writing his life constantly in view; as he was well apprised of this circumstance, and from time to obligingly satisfied my inquiries, by communicating to me the incidents of his early years; as I acquired a facility in recollecting, and was very assiduous in recording, his conversation of which the extraordinary vigour and vivacity constituted one of the first

features of his character, and as I have spared no pains in obtaining materials concerning him, from every quarter where I could discover that they were to be found, and have been favoured with the most liberal communications by his friends; I flatter myself that few biographers have entered upon such a work as this with more advantages; indepedent of literary abilities, in which I am not vain enough to compare myself with some great names who have gone before me in this kind of writing.'

श्री दासगणूमहाराजांचे चरित्रलेखक वैद्य श्री. अनंतराव आठवले यांच्या ठिकाणीं हे सर्व सुयोग जुळून आलेले दिसतात.

(१) त्यांना अगदीं जन्मापासून तों या क्षणापर्यंत संत श्री दासगणूमहाराज यांच्या सहवासांत राहण्याचें सौभाग्य प्राप्त झालें आहे. श्रीयुत अनंतराव हे श्री दासगणूमहाराजांच्या मानसपुत्राचे पुत्र असल्यानें त्यांच्या कुटुंबियांपैकींच एक आहेत. (२) श्री. अनंतरावांच्या मनांत बरींच वर्षे चरित्र लिहावें असें वाटत होतें व त्या दृष्टीनें त्यांची तयारी बरींच वर्षे चालली होती. (३) श्रीयुत अनंतराव हे आयुर्विद्यापारंगत आहेत. त्यांचा संस्कृतचा अभ्यास उत्तम आहे. ते उत्तम कीर्तन करतात. स्वत: आख्यानें रचतात व काव्य करतात. ह्यामुळें श्री दासगणूमहाराजांच्या चरित्रांतील गोष्टी व काव्यांतील मर्म समजण्याची त्यांच्या ठिकाणीं पात्रता आहे. (४) त्याचप्रमाणें श्री दासगणूमहाराज यांच्या संबंधित जीं माणसें त्यांच्या गांठी श्री. अनंतराव हे घेऊं शकले व त्या मंडळींनींहि मोठ्या प्रेमानें व आदरानें पुसलेली माहिती पुरवली. (५) व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांपैकीं कांहीं मंडळी लिखाणाचा खरेखोटेपणा सांगण्यास आज हयात आहेत.

श्री दासगणूमहाराज यांच्या चरित्रांत असा कांहीं भाग आहे कीं त्या ठिकाणीं या जिवंत माणसांच्या शब्दांवरून गोष्ट बरी वाईट ठरणारी आहे. उदाहरणार्थ, श्री दासगणू हे 'दासगणू' होण्यापूर्वी व कवित्व करूं लागल्यानंतरहि कांहीं वर्षे तमाशे करीत, करवीत, लावण्या तयार करीत व म्हणवीत. अर्थातच तमाशांत डफ वाजवणारे साजिंदे, नाचणाऱ्या गाणाऱ्या बाया यांच्याशीं त्यांचा नित्याचा संबंध असावयाचा व असा संबंध असल्यानें सामान्य मनुष्यानें जर अशी कल्पना केली कीं पूर्व आयुष्यांत दासगणूमहाराज यांना कांहीं दोष लागला असावा तर ती कल्पना अगदींच अवास्तव ठरणार नाहीं. पण वस्तुस्थिति अगदीं उलट होती. दासगणू हे 'पद्मपत्रमिवांभसि' असे शुद्ध राहिले व यास साक्ष-त्यावेळचे त्यांचे अनेक मोठ्या अधिकाराच्या जागेवर

असणारे स्नेहीसोबती त्याचा शुचिपणा अथवा पावित्र्यरक्षण सांगण्यास आज हयात आहेत.

इतका गोष्टींचा मेळ होणें हा सुयोग या चरित्राच्या बाबतींत जुळून आल्यानें हें चरित्र सर्वांगसुंदर झालें आहे असें वेगळें सांगण्याची गरज नाहीं.

माझा व श्री दासगणू यांचा स्नेहसंबंध गेल्या चाळीस वर्षांचा आहे व तो आजहि वाढता आहे. सन १९११/१२ च्या सुमारास श्री. बाळासाहेब ढमढेरे मामलेदार पंढरपुरांत प्लेग असल्यामुळें गांवाबाहेर असतांना दासगणूमहाराजांच्या कीर्तनाचा वरचेवर थाट चालायचा व प्लेगच्या दिवसातसुद्धां हजारोंनीं श्रोते जमा व्हावयाचे. त्यावेळी श्री. अनंतराव यांच्या वडिलांनीं गायिलेलें **'पाटील झाला पिसा। दिसतो वैदु जसा'** हे पद, तसेंच त्यावेळचें बोधलेबोवांचें दासगणूमहाराजांचें आख्यान कानांत आजहि गुणगुणत आहेत. परवांपरवांपर्यंत सवड साधेल तेव्हां श्री दासगणूंच्या कीर्तनास मी जात असें व अजूनहि अशी प्रथा चालू आहे, कीं पंढरपुरीं अगर पुण्यांत त्यांना भेटावयास गेलों म्हणजे श्री. छगनसारख्याकडून त्यांचें एक आख्यान ऐकल्यावांचून परत यावयाचेंच नाहीं.

चरित्र लिहिणें हें एका दृष्टीनें सोपें पण दुसऱ्या दृष्टीनें नाजुक व अवघड असें काम आहे. कारण, दुसऱ्याचें चरित्र कळण्यास त्याच्याशीं समरस होण्याची पात्रता अंगीं लागते. एरवीं त्याच्या वागणुकीची आपणांस कल्पना येणार नाहीं. आपण त्या जातीचें व्हावें तेव्हां त्यांचें महिमान कळतें हें खरें आहे. व्यवहार करणाऱ्या माणसाचें चरित्र कळणें सोपें आहे. कारण आपण व्यवहारी असतों व आपल्या वृत्ति आपणांस ठाऊक असतात. आपण त्यावरून व्यवहारी मनुष्याच्या वृत्तीची कल्पना करूं शकतों. पण व्यावहारिक लाभ दिसत असतांना पारमार्थिक अदृश्य लाभाकरितां चालून आलेला लाभ टाकणारा दिसला कीं व्यवहारी मनुष्यास त्याची उपपत्ति लावणें कठिण जातें. तो त्याला वेडयांत तरी काढतो अथवा ती गोष्ट जुनी असली तर कपोलकल्पित तरी ठरवतो. घरांत खायला नाहीं, पोरेंबाळें, बायको अन्नाविना रडत आहेत अशा स्थितींत तत्त्वपरिपालन म्हणून पाया पडून आलेलें मोहरांचें ताट लाथाडणाऱ्या तुकारामबोवांची, कवडी सकाळच्या प्रहरीं दिसली कीं कपाळाला लावणारा जो द्रव्यलोभी, त्याला कशी कल्पना येणार? त्यानें ही कथा ऐकली कीं तो म्हणणार, 'अहो हीं कथेकरी कवि यांनीं रचलेलीं आख्यानें! असें कोठें घडतें आहे?' आतां हा तुकारामबोवांचें चरित्र काय जाणणार व कसें लिहणार? तात्पर्य, संतांचें महिमान कळण्यास संतांची ईश्वरनिष्ठा, तपश्चर्या, जिव्हाळ्याची भक्ति, त्याग, प्राणिमात्रांविषयींचें प्रेम व त्यांच्या कल्याणाची काळजी इत्यादि गुण अंगीं लागतात. तरच संतांचें महिमान

खरें कळेल. तुकारामबोवांनीं म्हटलें आहे—

'भक्तांचा महिमा भक्तचि जाणती।
दुर्लभ या गती आणिकांसी।।
तुका म्हणे अंगें व्हावें तें आपण।
तरीच महिमान येईल कळों।।१।।'

श्री दासगणू यांच्या ठिकाणीं ईश्वरनिष्ठा, जिव्हाळ्याची भक्ति वगैरे गुण असल्यानें व त्यांच्यावर श्री साईमहाराज व श्री वामनशास्त्री इस्लामपूरकर या साधूंची कृपा झाल्यानें त्यांना हीं संतचरित्रें गाणें सहज झालें व त्यांना गोडी आली.

या संतचरित्राच्या बाबतींत त्यांचें कार्य व प्रसिद्ध कै. ह. भ. प. लक्ष्मणरावजी पांगारकर व नुकतेच कैलासवासी झालेले श्री. आजगांवकर या संतचरित्रलेखकद्वयांच्या कार्यांची तुलना करण्यासारखी आहे. कै. पांगारकर व कै. आजगांवकर आपआपल्या परीनें थोरच आहेत. व संतचरित्रांच्या बाबतींत त्यांचें कार्यहि मोठें आहे. पण संतचरित्रें सुशिक्षित–अशिक्षित सर्वांस आवडतील अशीं करणें हें कार्य श्री दासगणूंनीं जितक्या प्रमाणावर केलें इतकें या दोघांना करतां आलें नाहीं, हें कोणीहि सांगेल. कारण श्री दासगणूंनीं संतचरित्रे रचलीं व गाईली. व इतर लेखकांनीं लिहिलीं. कै. तात्यासाहेब केळकर यांनी म्हटल्याप्रमाणें श्री. दासगणू यांनीं शक्यतितकीं माहिती मिळवून ती गाईली असल्यामुळें सोन्यास सुगंध यावा तसा प्रसंग घडून आला आहे. श्री. दासगणूनें संतचरित्रें उत्कृष्ट अशा काव्यांत गुंफलीं, स्वत: आख्यानरूपानें कथेंत वर्णिलीं, यामुळे ती जिवंत अथवा चैतन्ययुक्त झालीं व तीं श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव एकदम गाठूं शकलीं. श्री दासगणूंच्या डोळयांतून अश्रुधारा वाहूं लागल्या, दामुबोवा राग आळवूं लागले कीं श्रोतेहि भक्तिरसांत बुडून जात. यामुळें त्यांच्या काव्याचा वेगळा परिणाम होई व म्हणूनच त्यांना संतांच्या चरित्राचा मोठा प्रसार करतां आला.

तात्पर्य, श्री दासगणूमहाराजांनीं जुन्या-नव्या सर्व संतांचीं चरित्रें प्रसादयुक्त गायिलीं व जुन्या संतचरित्रांचें आयुष्य वाढविलें. अर्वाचीन संतांचीं चरित्रें तर या आधुनिक महिपतीच्या इतकीं माहितीपूर्वक व प्रसादपूर्ण भाषेंत वर्णन केलेलीं दुसरीकडे आढळणारच नाहींत असें म्हटलें तरी चालेल.

श्री दासगणू हे जसे कवि म्हणून प्रसिद्ध आहेत. तसे ते कीर्तनकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कीर्तनास हजारोंनीं श्रोतृवृंद उपस्थित असतो व त्यांत पंडित, ज्ञानी, शेतकरी, सुशिक्षित, अशिक्षित, सुधारक, सनातनी, मोठीं माणसें, मुलें, बायापुरुष सर्व प्रकारचे लोक असतात. श्री दासगणूंचें कीर्तन म्हणजे ज्याच्यांत गहन

वेदान्तविषयक पूर्वपक्ष उत्तरपक्ष आहेत, संस्कृतांतील श्रुतिस्मृति, आचार्यांचे ग्रंथ यांच्यांतील पंक्तीच्या पंक्ति श्रोत्यांसमोर ओतल्या जात आहेत, दोन दोन तीन-तीन आख्याने एकदम लावताहेत, असें विद्वत्तापूर्ण ज्याला म्हणता येईल असें कीर्तन नव्हे. बरें ते स्वत: मोठे पट्टीचे गवई आहेत व नानाप्रकारचे राग छेडताहेत असेंहि नव्हे. अशा स्थितींत त्यांच्या कीर्तनास हजारोंनीं श्रोते ओढले जातात, ही वेध लावण्याची जी त्यांत शक्ति आहे तिची मीमांसा लेखकाच्या मतें थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे.

श्री दासगणूंचें कीर्तन हे हरिदासी कथा अथवा भजनीनिरूपण याहून थोडें वेगळ्या स्वरूपाचें आहे. भजनीनिरूपणांत पूर्वरंग-उत्तररंग नसतो. श्री दासगणूंच्या कीर्तनांत पूर्वरंग उत्तररंग असतो व या बाबतींत त्यांच्या कीर्तनाचा थाट हरिदासीकथेसारखा आहे. पण पुरा 'हरिदास' ही नाहीं. कारण श्री दासगणू हे स्वत: कवि असल्यानें व आख्यानें रचण्याची त्यांना आवड असल्यानें कीर्तनांत ते स्वत:चेंच कवित्व उपयोगांत आणतात. क्वचितच इतर कवींच्या ओव्या, आर्या अगर दिंड्या घेतात. त्यांच्या कीर्तनाचें लोकांना वेड लागतें याचे मर्म, प्रसादयुक्त पण अगदीं आधुनिक भाषेंत ते आपले विचार मांडतात व ते गेयस्वरूपाचे असल्यानें गातात, यांत आहे. अलिकडे साहित्यसंमेलनांतून कवीनें आपली कविता स्वत: गाण्याचा एक कार्यक्रम असतो. त्या कार्यक्रमास किती गर्दी लोटते हें ज्यानें पाहिलें असेल त्याला वरती लिहिलेली गोष्ट चटकन् पटेल.

श्री दासगणू यांनीं कीर्तनें हजारों श्रोत्यांना आपलें वेड लावतात याचें वर सांगितलेलें हें एक प्रमुख कारण आहे. पण त्यास तशींच दुसरींहि महत्त्वाचीं कारणें आहेत. त्यांच्या कीर्तनांत कटाव, दिंड्या, श्लोक वगैरे जुन्या कीर्तनकारांच्या चालीतीलच कवनें पुष्कळशीं असतात. पण त्यांच्या कीर्तनाचा मुख्य गुण म्हणजे इतर कथांतून क्वचित् आढळून येणारा असा 'साधेपणा' त्यांच्या कीर्तनांत आढळून येतो. त्यांचे कीर्तन म्हणजे 'एकांकीं नाटक' होत नाहीं. तें दंभ टाकून तळमळीनें केलेली देवाची प्रार्थना अथवा जगास तळमळीनें केलेला उपदेश अशा स्वरूपाचें असतें. त्यांत कृत्रिमतेचा लेश नसतो. कीर्तनांत जरी पूर्वरंग असला तरी तो वर म्हटल्याप्रमाणें क्वचितच घटप्राभाव प्रध्वंसाभाव वगैरे सारख्या विवादविषयक तत्त्वांचा असतो. पंडित्य दाखवण्याचें कीर्तन तें नव्हेच, त्यांच्या कीर्तनांतून नीति, धर्म, सदाचार यांचाच प्रामुख्यानें उपदेश ते करीत असल्यानें तशाच जातीचा साधा पूर्वरंग असतो व हें करीत असतांना साधी सरळ भाषा व आंतबाहेर कांहीं न ठेवता सत्यकथन केलेलें असतें. त्यांत पुष्कळ वेळेला सामाजिक दोषाची निर्भिडपणें चिरफाड, दंभस्फोट असतो ; मग तो सनातन्यांतील दंभाचा असो वा सुधारकांच्या दंभाचा असो. श्री दासगणू यांना

खोटयाची चीड किती होती व तें उघडकीस आणण्यांत आपणास व्यक्तिश: कितीहि त्रास झाला तरी तो सहन करण्याची त्यांची कशी तयारी असते याचीं उदाहरणें त्यांच्या चरित्रांत कितीतरी सांपडतील. येथें पुस्तकांतील 'दंभस्फोट' या प्रकरणांतील ठळक उदाहरणांकडे बोट करतां येईल. फार महत्त्वाची व म्हणून लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं हा दंभस्फोट जे परके असतील त्यांचा करावयाचा व आपले आहेत त्यांच्यावर पांघरूण घालावयाचें असा जसा कित्येक वक्त्यांचा स्वभाव असतो तसा श्री दासगणूंचा नव्हे. आपल्या घरांतील म्हणून त्यांनीं कोणाची गय केली नाहीं.

तात्पर्य, श्री दासगणूमहाराजांचें कीर्तन सर्वांना आवडतें याचीं कारणें अशीं आहेत कीं त्या कीर्तनांत सर्वांना आवडणारा भोळा भाव आहे, यामुळें तें आबालवृद्ध भाविक जनांना प्रिय होतें; खोटयाचा – दंभाचा-स्फोट व सत्याचें मंडन असल्यानें चिकित्सक सुधारकांना तें प्रिय वाटतें; जुन्या संस्कृतीचा अभिमान यांत व्यक्त होत असल्यानें तें सनातन्यांना आवडतें, पण अगदींच जुन्या चाकोरीला धरून **'तातस्य कूपोयमिति ब्रुवाण:क्षारं जलं कापुरुषा: पिबन्ति'** या वर्गांतील तें नसल्यानें जुन्यास उद्बोधक नवें घेऊन पुढें जाणें अवश्य असा जुन्या नव्याचा ते समन्वय करतात म्हणून नवीन सुधारकांनाहि पसंत पडतें. निरपेक्षपणानें देवाला आळवणें व सदुपदेश करणें याच हेतूनें कीर्तन होत असल्यानें त्यांची टीकाहि बोचक वाटत नाहीं व स्वत:चें उत्कृष्ट कवित्व स्वत:च म्हणत असल्यानें रसिकांना तें प्रिय आहे. थोडक्यांत श्री दासगणूंच्या कीर्तनाचें वर्णन करावयाचें म्हणजे श्री एकनाथांनीं पुढील अभंगांत म्हटल्याप्रमाणें त्यांचें 'संतघराच्या मर्यादेंत' कीर्तन होतें व म्हणून सर्वांना प्रिय होतें.

**''सगुणचरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी।**
**सज्जनवृन्दे मनोभावे आधीं वंदावीं।।**

**संतसंगे अंतररंगे नाम बोलावे।**
**कीर्तनरंगीं देवासान्निध सुखेंचि डोलावें।।२।।**

**भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरां न कराव्या।**
**प्रेमभरें बा वैराग्याच्या युक्ति विवराव्या।।३।।**

**जेणें करुनीं मूर्ति ठसावी अंतरी श्रीहरीची।**
**ऐसी कीर्तनमर्यादा आहे संतांच्या घरचीं।।४।।**

आटीव गाईचें दूध, त्यांत खडीसाखर, वर केशराची काडी व वेलदोडयाची पूड असावी म्हणजे त्या दुधास गोडी येऊन तें सर्वांनाच किती प्यावे असे वाटते अशा गोदुग्धामृताप्रमाणें श्री दासगणू यांचे कीर्तन मसालेदार गोड आहे व म्हणूनच

ते पुनः पुनः श्रवण करावें असें सर्वांना वाटते.

रत्नांत ज्याप्रमाणें हिरे, माणिक, पाचू वगैरे प्रकार असतात तसे यांच्या ग्रंथांत आहे. श्री. आठवले यांनीं जें वर्गीकरण केलें आहे त्यांत पंधरा वर्ग सांगितले आहेत. त्यांत संतचरित्रें, टीकात्मक ग्रंथ, स्फुट पदें, आरत्या, अष्टकें, स्तोत्रें, पोवाडे, खंडकाव्य, सुभाषितें, कीर्तनोपयोगी आख्यानें इत्यादि प्रकारें आहेत. नुसतीं आख्यानें पुरीं ५९ व अपूर्ण ४ मिळून ६३ आहेत. ओवीबद्ध टीकाग्रंथ आठ आहेत. संतचरित्रात्मक ओवीबद्ध ग्रंथ ११ आहेत. व अजूनहि यांत ८८ व्या वर्षी भर पडतच आहे! महाराजांचे श्वासोच्छ्वासादि प्रबंध व्हावेत अशी श्री पांडुरंगाची कृपा असल्यामुळेंच एवढी ग्रंथरचना होऊं शकली यांत शंका नाहीं.

श्री दासगणू यांच्या काव्याची चर्चा श्री. आठवले यांनीं १८० पानांत केलेली आहे. साहित्यशास्त्राच्या कसोटीला लावून बघितलें असता त्यांच्या काव्यांत किती गुण उतरतात, हें श्री. आठवले यांनीं उत्कृष्टपणें दाखवलें आहे.

श्री दासगणूंच्या काव्यासंबंधीं आणखी एक गोष्ट सांगणें आवश्यक वाटतें. कित्येकांना वाटतें कीं लोकगीत होण्याकरतां काव्याचा विषय शृंगारच लागतो. अध्यात्मासारख्या 'नीरस' विषयावर काव्य रचून काय उपयोग? 'कोण वाचणार' असें कित्येक लोक म्हणतात. तसेंच कित्येक म्हणतात, 'अहो, ईश्वर, संत, त्यांचें चमत्कार हे आतां शिळे जुनाट विषय झाले. याला आतां गिऱ्हाईक नाहीं. 'डोळ्यांनीं बघतो ही ईश्वराची कृपा' अथवा 'आई थोर तुझे उपकार' इत्यादि काव्यांना आतां हल्लींच्या समाजांत स्थान नाहीं.' या असल्या सर्व शंकांना श्री दासगणूंच्या काव्यासंबंधीं लोकांनीं दाखवलेली रुचि ही उत्कृष्ट उत्तर आहें. जुनेच विषय पण मांडणी अशी सुंदर, भाषाहि ठसकेबाज, वर्णनें अशीं हुबेहुब कीं श्रोत्यास वाटावें आपण नव्यानेंच हें चरित्र ऐकत आहोंत. ज्याला स्फूर्ति आहे. ज्याला प्रतिभा आहे, त्यांना जुना विषय सुद्धां चालतो. त्याला अध्यात्म आड येत नाहीं. 'शृंगारचिया माथा' पाय ठेवीत अध्यात्म डौलानें तेथें वावरतें.

श्री. अनंतराव यांनीं या ग्रंथांत प्रथम विभागांत श्री दासगणूंचें चरित्र २१७ पानें दिलें आहे. दुसरा विभाग वाङ्मयपरिचय यामध्यें त्यांची भूमिका देऊन त्यांच्या वेगवेगळ्या काव्यप्रकारांशीं वाचकांचा परिचय करून दिला आहे. 'एक गहूं प्रकार बहु' अशांतलाच हा प्रकार आहे. जसे गव्हाचे 'मांडे', 'घीवर', 'पुऱ्या', 'गव्हले' वगैरे प्रकार करतात, तसेंच 'भगवद्भक्ती'चे वेगवेगळ्या रूपांत हे अविष्कार आहेत. सर्वच गोड आहेत, पण प्रत्येकाची चव वेगळी आहे. हा भाग २१९ व ४०८ पर्यंत

दिला आहे. पुढें काव्यग्रंथांची यादी ओवीसंख्या व पंक्तिसंख्येसह दिली आहे. शेवटीं वाचकांना इतका हा दूधसागर पिण्यास सवड नसणार म्हणून कांहीं निवडक वेंचें देऊन श्री दासगणू महाराज यांच्या व्यक्तित्वाचा आणि वाङ्मयाचा परिचय करून देण्याचें कार्य संपवलें आहे.

श्री आठवले यांनी चरित्रविषयक ग्रंथास आवश्यक असणारी सर्व सामग्री कसोशीनें गोळा केली आहे व तिची निवड करून वाचकांच्या समोर हें भक्तिरसानें भरलेलें ताट ठेवलें आहे. वाचकवर्ग याचा आस्वाद घेऊन 'अन्नदाता' सुखी होवो आणि त्याच्याकडून अशीच श्री पांडुरंगाची सेवा घडो असा आशीर्वाद देईल अशी माझी खात्री आहे.

या ग्रंथाचे विषय श्री दासगणूमहाराज यांना ८८ वें वर्ष लागलें आहे. या उतार वयांतहि ते विचारसागरासारख्या शारीरभाष्यांतील प्रक्रिया सांगणाऱ्या ग्रंथास ओव्यांचें रूप देतच आहेत. हें पाहून श्री नामदेवरायांनीं जी श्री रुक्मिणीरमण पांडुरंगाची प्रार्थना केली तिची आठवण होते.

**'आकल्प आयुष्य व्हावें तया कुळां।**
**माझिया सकळा हरिच्या दासां।।'**

---

## ''श्री साईलीला'' सभासदांना निवेदन

शिरडीचे श्री साईबाबा हे भारतीयांच्या व परदेशीयांच्या धर्मनिरपेक्षतेचे प्रतीक असून शिरडीला आगळ्या तीर्थक्षेत्राचे स्वरुप प्राप्त झालेले आहे. साईभक्तांना सर्वतऱ्हेच्या सोई उपलब्ध करुन देण्याकरिता संस्थान प्रयत्नशील आहे. श्री साईबाबांचा संदेश सर्वदूर पसरविण्यासाठी ''श्री साईलीला'' हे मासिक आम्ही प्रत्येक महिन्याला प्रसिद्ध करीत असतो.

साईभक्तांना अधिक चांगल्या प्रकारची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी हे ''श्री साईलीला'' मासिक प्रत्येक दोन महिन्यानंतर द्वैमासिक स्वरुपात प्रकाशित करायचे आमच्या विचारार्थ आहे. ह्या नव्या योजनेनुसार ''श्री साईलीला'' मोठ्या आकारात व आकर्षक स्वरुपात प्रसिद्ध होईल. त्यात बाबांच्या कार्याबरोबरच धर्म, तत्वज्ञान, भक्ती, योग, सामाजिक शास्त्रे इत्यादी विषयांवर मान्यवर लेखकांचे लेख प्रसिद्ध करण्यात येतील. ह्या नवीन योजनेचे आमचे आदरणीय वाचकभक्त स्वागत करतील अशी आशा आहे.

\- कार्यकारी संपादक

---

# श्रीसाई गाथामृत

## राधाकृष्ण माई

(श्री साईलीला, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर १९५५ अंकावरून)

(मागील अंकावरुन पुढे चालू)

लेखक–ना. वा. गुणाजी

'माई या फार उदार व प्रेमळ स्वभावाच्या होत्या. खरोखरच त्या माई म्हणजे माताच होत्या. प्रथम पासून मी त्यांना माता मानीत असें आणि त्याहि मला पुत्र मानीत असत. बाबांकडून त्यांना जी कांहीं भाजीभाकर येई तोच प्रसाद मानून त्यावरच त्या रहात असत आणि मी तेथें गेलों म्हणजे बाबा अधिक भाजीभाकर पाठवीत. बाबांकडून अधिक भाजीभाकर येणें म्हणजे तें माझ्या आगमनाचें सूचक होतें. आणि त्याप्रमाणें मी लगेच कांहीं वेळानें तेथें हजर होत असें.

'त्यांची बाबांविषयीं भक्ति फार प्रेमळ, पण उत्कट व जोरदार असे. त्यांचें जीवित बाबांकरितांच होतें. बाबांना, त्यांच्या भक्तांना–त्यांच्या संस्थानाला जें कांहीं लागेल, किंवा जरूर व आवश्यक असेल, तें करून पार पाडतांना त्यांना फार आनंद वाटे.

'बाबांची शिकवण व मदत मला त्यांच्यामार्फत एका विशिष्ट तऱ्हेनें मिळत असे. त्या इतक्या खुल्या दिलाच्या आणि कृपाळू असत कीं, प्रथमपासून मी माझ्या कल्पना, माझे विचार, माझें सर्व दिल त्यांच्यापुढें मोकळें करीत असें; आणि त्याहि आपल्या सर्व कल्पना, विचार आणि बेत मला सांगत. पारमार्थिक साधनाविषयीं त्यांचें म्हणणें असें होतें कीं, आपण जें कांहीं साधन करितों त्याची वाच्यता करूं नये आणि त्याचा पत्ता दुसऱ्यांना बिलकुल लागूं देऊं नये आणि आपली उन्नति कशी होत आहे हेंहि त्यांना समजूं देऊं नये, आध्यात्मिक प्रयत्नाच्या सिद्धीसाठीं गुप्तपणा अत्यावश्यक आहे. बाबांचेंहि मत असेंच असे. ते म्हणत असत कीं,–'जिन्ने कमाया उने छुपाया.'

'त्यांच्या धार्मिक क्रियाविषयीं–साधनांविषयीं सांगावयाचें तर त्या फार उत्कृष्ट गायक होत्या आणि त्यांचा कंठहि फार गोड, दिव्य मधुर असा होता; आणि त्यांना संगीताचें ज्ञानहि होतें. त्यांना सतारहि वाजवितां येत असे. मलाहि संगीताचें ज्ञान असून गाणें बजावणें समजत असे. त्यांचें गाणें ऐकिलें कीं, माझा मनोलय होऊन मी त्यांत मुरून जात असें.

'याप्रमाणें कांहीं दिवस चाललें असतां एके दिवशीं आध्यात्मिक साधन कोणत्या प्रकारचीं असावीं या विषयीं आमचें संभाषण झालें. स्तोत्रें, भजनें गाणीं,

ही आपापल्यापरीनें चांगलीं आहेत हें खरें, बाह्य लोकांचें मन तीं बरेंच आकर्षण करितात, परंतु आमच्या पुढील उन्नतीसाठीं तीं पुरेशीं होत नाहींत. तेव्हां जप हेंच साधन आम्हांला योग्य आहे असें ठरलें, पण जपासाठीं कोणतें नाम पसंत करावें हा प्रश्न आला. त्या म्हणाल्या कीं, 'पुष्कळ लोक राम हरि, विठ्ठल इत्यादि नांवें घेतात, पण माझ्यापुरतें सांगावयाचें तर साईबाबा माझी इष्टदेवता आहे. मी त्यांच्याच नांवाचा जप करणार' आणि माझ्या पसंतीप्रमाणें विठ्ठल इत्यादि देवतांचें नांव जपासाठीं मी घ्यावें. मी सांगितलें कीं, मी विठ्ठल पाहिला नाहीं, आणि आपणाला जें नांव (साई) पसंत आहे तेंच मलाहि मान्य आहे, आणि त्याप्रमाणें मी साईनामाचाच जप करीत जाईन. तेव्हां सवडीप्रमाणें आम्हीं समोरासमोर बसूं आणि तासतासभर साईनामाचाच जप करूं. एके दिवशीं सायंकाळीं बाबानीं मला बोलावून विचारलें कीं, सकाळीं आपण काय करीत होतां? जप असें मी सांगितलें. बाबा–कोणाच्या नांवाचा? मी–माझ्या देवतेच्या. बाबा–तुझी देवता कोणती? मी–तें आपणास माहीत आहेत. तेव्हां ते हांसले आणि म्हणाले–तें बरोबर व योग्य आहे.

यांप्रमाणें राधाकृष्णमाईंना व मला न कळतच पारमार्थिक साधन कोणतें असावें आणि जप कोणाचा करावा हा सर्व बनाव बाबांनीं आपल्या शक्तीनें घडवून आणला असें मला वाटतें.

**श्रीरमण भगवान:** - या संबंधीं श्रीरमण भगवानांचे उपदेशसारांतील दोन श्लोक लक्षांत ठेवण्याजोगे आहेत ते असे :–

कायवाङ्मन: कार्यमुत्तमम्
पूजनं जपश्चिंतनं क्रमात्॥

अर्थ–शरीराचें कार्य पूजन, वाणीचें कार्य जप आणि मनाचें कार्य चिंतन (ध्यान) ही क्रमानें एकाहून एक श्रेष्ठ आहेत.

उत्तमस्तवादुच्यमंदत:
चित्तजं जप ध्यानमुत्तमम्॥

अर्थ–वाचिक (मोठ्यानें उच्चारला जाणारा) जप, दुसऱ्यास ऐकूं न जाईल (अशा हलक्या स्वरानें ओठांतल्या ओठांत केला जाणारा) असा उपांशु जप, यांचेपेक्षां मनांतल्या मनांत केलेला मानसिक जप (म्हणजे ध्यान) उत्तम होय.

अशा तऱ्हेनें सर्व साईभक्तांनीं बाबांचा मानस जप म्हणजे ध्यान, प्रेमानें आणि आदरानें करीत जावें असें सुचवून हा लेख पुरा करितों.

श्री राधाकृष्णमाईंनीं आपल्या बाबांच्या भक्तीचा अंश, मोठा अगर लहान द्यावा अशी सर्व साईभक्तांतर्फे त्यांची प्रार्थना करून रजा घेतों.

**ॐ नमो साईरमणाय**

## साईभक्तांचे अनुभव...४

# शांताराम बळवंत नाचणे, डहाणूकर

(१९ सप्टेंबर, १९३६, ठाणे)

मूळ लेखक– कै. बी. व्ही. नरसिंहस्वामी, मद्रास.
मराठी अनुवाद– श्री. श. बा. पटवर्धन, मुंबई.

(पूर्वार्ध)

मी साईलीलेत माझे काही अनुभव दिले होते. पण त्या वेळीं मी ते जपूनच दिले होते. कारण साईलीला वाचकांपैकी बऱ्याच लोकांचा माझ्या खऱ्या अनुभवावर विश्वास बसला नसता. पण त्या गोष्टीला बराच कालावधी लोटला असला तरी मी तुम्हांस पुष्कळ सविस्तर अनुभव सांगेन. शिवाय १९३३ नंतरचे अनुभव पण तुम्हापुढे मांडीन.

सन १९०९ साली अशा काही घटना घडल्या की ज्यांचा साईबाबांशी काही संबंध असेल असे मला मुळीच वाटले नाही. त्या वर्षी माझ्या थोरल्या भावाच्या गळ्याचे ऑपरेशन मुंबईस डॉ. भाजेकरांच्या हॉस्पीटलमध्ये करावयाचे होते. त्यामुळे आम्ही सर्वजण काळजीत होतो. त्यावेळी मी डहाणूस असताना एक साधू येऊन त्याने भाकरी मागितली. आम्ही त्यास घरात बोलाविले आणि साग्रसंगीत भोजन दिले. माझी वहिनी त्याला वाढीत होती व तिने त्याला भेंड्याची भाजी वाढली नाही. कारण एका पूज्य व थोर साधूला भेंड्याच्या भाजीसारखे हलके तोंडी लावणे कसे वाढायचे या विचाराने ती शरमली. पण त्या साधूने ती भाजी मागून घेतली म्हणून त्याला वाढली. भोजन झाल्यानंतर त्या साधूने आम्हा सर्वांस आशिर्वाद देऊन सांगितले की त्या दिवशीचे ऑपरेशन सुखरुपपणे पार पडले आहे. त्याच दिवशी माझे स्नेही हरिभाऊ मोरेश्वर पानसे मला म्हणाले, ''साईबाबांच्या कृपेने ऑपरेशन यशस्वी होईल.'' त्याचवेळी बाबांचे नांव प्रथम माझे कानावर आले. संध्याकाळी माझे वडील मुंबईहून आले व त्यांनी ऑपरेशन ठीक झाल्याचे सांगितले. ऑपरेशन झाल्यावर एक साधू तेथे आला व त्याने ऑपरेशन झालेल्या भागासकट सर्व शरीरावरून हात फिरविला आणि म्हणाले, ''सर्व काही ठीक होईल.'' त्याच वर्षी माझे वडीलांनी दासगणूंचे कीर्तन ऐकले. कीर्तनात बाबा दत्तावतारी असून त्यांच्या अंगी अद्भुत शक्ती आहे अशी दासगणूंनी बाबांची महती गायली. नंतर आम्ही बाबांचा फोटो घेतला

त्र उदबत्ती लावून पूजा करण्यास सुरुवात केली.

सन १९१२ साली मी प्रथम शिरडीस गेलो. त्यावेळी मी रेव्हेन्यू खात्याच्या परीक्षेस बसलो होतो व अजून निकाल लागायचा होता. माझेबरोबर माझे दोन मित्र, शंकर बाळकृष्ण वैद्य व अच्युत दाते होते. कोपरगावला उतरलो व तेथील स्टेशन मास्तरला आम्ही शिरडीस जात आहोत असे कळल्यावर त्यांनी बाबा हे एक साधारण मंतर करणारे जादूगर आहेत आणि चांगले लोक उगीच त्यांचे नादी लागतात असे उद्गार काढले. ते ऐकून माझ्या मनाची थोडी चलबिचल झाली आणि आपण खरोखरच एक महान साधुच्या दर्शनास जात आहोत का या विषयी मनात संभ्रम निर्माण झाला. पण काहीही करून आम्ही शिरडीस पोहचलो. आणि बाबा लेंडीवरुन परत येत असताना पाहिले. मला बघितल्यावर लगेच त्यांनी विचारले, "काय हो मामलेदारांची परवानगी न घेता आलात." मी कबुल केले. बाबा म्हणाले, "असा वागू नकोस," हे ऐकल्याबरोबर कोपरगावचे स्टेशन मास्तरने केलेली कुत्सित टीका मी विसरलो आणि मी खरोखरच एक महान दर्शन घेत आहे अशी माझी भावना झाली. आम्ही तीन दिवस तेथें राहिलो व नित्य बाबांच्या शक्तिचे नवे नवे स्वरुप व पैलू पाहून बाबांचे कट्टे भक्त बनलो.

बाबांनी माझे हातातून उदी घेऊन माझ्या कपाळाला लावली. असे बाबांच्या हातून उदी लावून घेण्याचे भाग्य फारच थोडच्या लोकांच्या वाटेस येत असे. मशिदीत आरतीसाठी मंडळी जमू लागली तेव्हा बाबांनी मला जेवण करून येण्यास सांगितले. मी बाबांना म्हणालो, 'आज एकादशी आहे.' सामान्यपणे मी एकादशीला उपास करीत नसे पण माझे बरोबर आलेले दोन स्नेही उपास करीत असत त्यांना काही ...र वाटू नये म्हणून मी पण उपास करण्याचे ठरविले. पण बाबांचे मनात तसे नव्हते. ते म्हणाले, "तुझे मित्र वेडे आहेत. वाड्यात जाऊन जेवून ये." एकादशी असूनही मी जेवायला मागत आहे म्हणून वाड्यातील आचारी कुरकुर करू लागला. आणि त्यानी मला आरती झाल्याशिवाय जेवण्याची व्यवस्था करणार नाही असे सांगितले. तेव्हा तो व मी असे दोघेही आरतीसाठी मशिदीत आलो. जेवलास का असे बाबांनी पुन्हा विचारले. तेंव्हा मी म्हणालो, "आरतीचा समय झाला आहे म्हणून आरती संपल्यावर जेवीन." यावर बाबांनी निक्षून सांगितले की माझे जेवणानंतरच आरती सुरु होईल. हे ऐकल्यावर आचाऱ्याने मुकाट्याने मला जेवावयास वाढले. जेवण आटोपून मी मशिदीत आरतीला गेलो. त्यावेळेस मावशीबाईंनी बाबांसाठी विडा आणला होता तो त्यांना दिला. त्यातला काही भाग बाबांनी मला देऊन तो मला खाण्यास सांगितले. एकादशीचे दिवशी विडा खाणे योग्य नसल्याने मी कांकू करु लागलो. बाबा म्हणाले, "खाऊन टाक." मी मुकाट्याने खाऊन टाकला. आरती

संपल्यावर बाबांनी माझेकडे ४ रुपये दक्षिणा मागितली व वैद्यांकडे १६ रुपये मागितले. आणि दाते यांच्या मनात दक्षिणा देणेचे नसल्यामुळे त्यांच्याकडे मागितली नाही. तेथे एक लहान मुलगी बाबांकडे संत्र्यासाठी हट्ट धरून बसली. वाड्यात दाते यांनी स्वत:साठी काही संत्रे ठेवली आहेत हे जाणून बाबांनी दाते यांना वाड्यातून घेऊन येण्यास सांगितले. पण दाते यांनी साफ सांगितले की ती त्याच्या एकादशीच्या फराळासाठी ठेवली असल्याने ती देता येणार नाहीत. बाबांनी पुन्हा त्यांचेकडे मागितली नाहीत. त्या मुक्कामात बाबांनी त्यांची आमच्या कुटुंबावर कृपा असल्याचे दाखवून दिले. काकासाहेब दीक्षित, बापूसाहेब जोग व अण्णासाहेब दाभोलकर असे तिघेही असताना बाबांनी सांगितले, ''मी याच्या घरी जेवायला गेलो. पण त्याने मला भेंड्याची भाजी काही दिली नाही.'' लगेच मला १९०९ साली माझ्या भावाच्या ऑपरेशनच्या वेळी येऊन गेलेला साधू आठवला – आणि मला असे वाटले की आम्हाला माहित नसतांना बाबा आमच्या कुटुंबाची काळजी तेंव्हापासून वाहत होते. नंतर मी त्या तिघांना सांगितले की त्या साधूला माझ्या वहिनीने भेंड्याची भाजी वाढली नव्हती. त्यानंतर पण दोन दिवस मी त्या साधूला पाहिले. त्याचे जवळून निरीक्षण करण्याची संधी पण मिळाली. पण नंतर मात्र तो साधू डहाणू सोडून गेला तो गेलाच. आणि १९१२ साली बाबा सांगत होते की ते त्या साधूच्या वेषात तेच येऊन जेऊन गेले. तसा साधू गहू वर्णाचा असून त्याला लांब दाढी होती. तशी बाबांना कधीच नव्हती. तो साधू बाबांच्या पेक्षा तुमच्यासारखा (बी. व्ही. एन. स्वामी) दिसला. माझ्या परिक्षेबद्दल बाबांना विचारले असता 'अल्ला मालिक है' असे म्हणून त्यांनी आपला वरदहस्त माझे मस्तकावर ठेवला. मी पास झालो हे सांगणे नकोच. शेवटच्या दिवशी मात्र माझ्या श्रद्धेला धक्का बसण्यासारखा प्रसंग घडला. त्यादिवशी बाबांनी एकाएकी नरसिंहरूप धारण केले. ते इतक्या आवेशात होते की जणु काय क्रोधाने उड्या मारत आहेत असे वाटले. डोळे म्हणजे खदिरांगार झाले होते व कोणाचीही त्यांचे जवळ जाण्याची छाती होईना. हे सर्व बघून मला क्षणभर वाटले की शेवटी त्या स्टेशन मास्तरचे उद्‌गार बरोबर होते की काय. थोड्या वेळाने बाबा शांत झाल्यावर आम्ही त्यांच्याकडे जाऊन मुंबईस परतण्याची परवानगी मागितली. त्यांनी आम्हाला उदी देऊन निरोप दिला. १९१२ साली बाबांनी माझ्यावर आणखी एक कृपा केली. मी जेव्हां डहाणुला होतो तेंव्हा ठाणे जिल्ह्यातून मुंबई उपनगर जिल्ह्यात बदली होणे शक्य नव्हते. पण बाबा तेंव्हा म्हणाले, ''नोकरीसाठी मुंबईस ये.'' या आशीर्वादाने माझी वांद्र्यास बदली झाली. मामलेदारांच्या परवानगीशिवाय रजा घेऊन मी शिरडीस गेलो होतो. आणि श्री. बा. वि. देव, मामलेदार यांच्या लक्षात ते आले होते. पण यातून मी असें पुन्हा न करण्याच्या ताकीदीवरच सुटलो. यानंतर मी वरचेवर शिरडीस जाऊ

लागलो. सन १९१३ साली मी जाण्यासाठी निघालो. मित्र हरिभाऊ म. पानसे मला भेटले. त्यांना अफरातफरीबद्दल शिक्षा झाली होती पण ते जामिनावर सुटले होते. म्हणून त्यांनी मला त्यांचे करिता बाबांची प्रार्थना करावयास सांगून ते म्हणाले, 'बाबांना सांगा मी अगदी निरपराधी आहे.' मी शिरडीस गेलो व बाबांना ही गोष्ट कळविण्याच्या आत त्यांनीच उल्लेख केला. हे काकड आरतीचे वेळेस झाले. ते अतिशय रागात होते. पण ते मला म्हणाले, 'त्याला सांग काही काळजी करू नकोस. अपिलात तू निश्चित सुटशील.' शिरडीहून परत डहाणूला आल्यावर पानसे भेटले. तेंव्हा त्यांना मी बाबांचे उद्‌गार सांगितले. तेंव्हा निर्दोष सुटका झाल्याचे त्यांनी सांगितले. शिरडीच्या याच मुक्कामात बाबा असे म्हणाले की माणसावर विश्वास ठेवू नये. या सर्वसाधारण प्रकाराशी माझा काही संबंध असेल असे मला वाटले नाही. पण १९१४ साली जो प्रसंग घडला तो पहाता बाबा मला उद्देशूनच बोलले होते असे मला वाटते. त्यावेळी मी डहाणूस ट्रेझरी मास्टर होतो. एके दिवशी सकाळी माझ्या नित्य पूजेत गुंतलो असताना रामकृष्ण बळवंत पानसे नावाचा वेडसर माणूस देवघराच्या दारात उभा होता. एकाएकी त्याने आवेशाने माझा गळा दाबून धरला आणि तो म्हणाला, 'तुझे रक्त पिऊन टाकतो.' लगेच मी पळी व माझे बोट अशी दोन्ही त्याचे तोंडात घातली. पळी त्याचे घशात अडकली व माझे बोट चावून त्याने रक्तबंबाळ केले. दुसऱ्या हाताने मी माझी मान सोडविण्याचा प्रयत्न करीत होतो. एवढ्यात माझी आई मदतीसाठी धावून आली. पण मी मात्र शुद्ध हरपून खाली पडलो. थोड्या वेळाने शुद्धीवर आलो तेव्हां माझ्यावर प्रथमोपचार चालू असल्याचे जाणवले. त्याची नखे माझ्या मानेत रुतून मला गळफास लागायची वेळ आली होती. पण काही दिवसांनी मानेवरच्या व पोटावरच्या जखमा बऱ्या झाल्या. यानंतर मी शिरडीस गेलो तेव्हा बाबा माझ्याकडे बोट दाखवून अण्णा चिंचणीकरांना म्हणाले, "मी एक क्षणभर उशीर केला असता तर हा माणूस खलास झाला असता. त्या वेड्यानी याचा गळा आवळला होता. पण मी याला सोडविला. काय करणार, माझ्या लेकरांचा बचाव मी नाही करायचा तर कोण करणार आहे?"

तारीख ३१.३.१९१५ रोजी एक थरारक प्रसंगातून आम्ही बाहेर पडलो. आम्ही रात्रीच्या वेळी एका बैलगाडीतून जंगलातून जात होतो. तेव्हा रानशेत घाटाजवळ आलो. घाटात वाघांची वस्ती आहे असे ऐकले होते. रात्र अंधारी होती. एकाएकी आमचे बैल भेदरुन मागे मागे जाऊ लागले. ती वाट इतकी अरुंद होती की बैल जरा डाव्या-उजव्या बाजूकडे वळले असते तर बैलगाडीसकट आम्ही खोल दरीत कोसळलो असतो. पण शांतारामनें समोर बोट करुन कशामुळे बैल भेदरले ते दाखविले. समोरच एक प्रचंड वाघ रस्ता अडवून बसला होता. त्याचे डोळे अंधारात चमकत

होते. गाडी बाजूला जाऊन कलंडू नये म्हणून पानसे चाकाखाली दगड लावण्यासाठी उतरुन त्याने बैलाचा कासरा माझे हाती दिला.

कासरा हातात घेऊन मोठ्याने ओरडलो, 'बाबा आम्हाला वाचवा.' इतर लोकही जोराने ओरडू लागले. व त्या गलक्याने तो वाघ आमच्या गाडीच्या शेजारून पळून गेला. अशा रीतीने बाबांनी आम्हाला मोठ्या भयंकर प्रसंगातून वाचविले. सन १९१५ साली मी शिरडीस निघालो असतांना स्टेशनवर माझे मित्र सामंत यांनी बाबांचे करिता एक श्रीफळ दिलें दोन आणे खडीसाखरेकरितां दिले. मी शिरडीस जाऊन दर्शनाच्या वेळीं तें श्रीफळ बाबांना दिलें पण दोन आण्याची गोष्ट अजिबात विसरलो. बाबांचा निरोप घेते वेळी बाबा म्हणाले, "जाताना चितळीवरून जा. पण माझे गरीब ब्राह्मणाचे दोन आणे का ठेवतोस?" मला लगेच आठवले व मी दोन आणे बाबांना देऊन पुन्हा निरोप घेतला.

"तू आता नीघ. कोठल्याही कामाची जबाबदारी घेतलीस की ते काम व्यवस्थितपणे पार पाड. नाहीतर जबाबदारी घेऊ नकोस." माझ्या शिरडीच्या मुक्कामात शंकरराव वैद्य तेथे आले. बाबांनी त्यांचेकडे रु. १६ दक्षिणा मागितली. माझेकडे पैसे नाहीत असे वैद्यानी सांगितले. थोडच्या वेळाने बाबांनी पुन्हा ३२ रुपये मागितले. यावर वैद्यांनी तेच उत्तर दिले. काही वेळाने बाबांनी पुन्हा ६४ रु. मागितले. आम्ही सांगितले, "बाबा एवढी मोठी दक्षिणा देण्याइतके आम्ही श्रीमंत नाही." त्यावर बाबा म्हणाले, "हे पैसे गोळा करून द्या." थोडच्या दिवसांत बाबा आजारी झाले. त्यानिमित्त भक्त मंडळींनी सप्ताह करून मोठ्या प्रमाणावर अन्नदान करण्याचे ठरविले. यासाठी पैसे लागणार होतेच. म्हणून दाभोळकरांचे सूचनेवरून मी व वैद्य वर्गणी गोळा करण्यास सुरुवात केली. जी वर्गणी जमा झाली ती बरोबर ६४ रुपये होती.

माझे मित्र रावजी सखाराम वैद्य यांची मुलगी प्लेगने आजारी होती. तिला मी बाबांची उदी दिली. त्या उदीने मुलगी साफ बरी झाली.

माझ्या वडिलांना थोडेसे डॉक्टरी ज्ञान होते. परशुराम अप्पाजी नाचणे नावाचे तलाठी बरेच दिवस आजारी होते. माझे वडील व इतर डॉक्टरांना ते बरे होतील की नाही अशी शंका होती. पण त्यांनी बाबांचे फोटो समोर उदबत्ती लावून प्रार्थना करणे व समोर एक तुपाचा कायम नंदादीप ठेवण्याने ते काही दिवसांनी संपूर्ण बरे झाले.

(क्रमशः)

# ''आले तुझ्याच दारी''

- सौ. मीना विठ्ठलराव घुगे
औरंगाबाद.

ॐ हाच मानवी जीवनातील संदेश वहनाचा पहिला शब्द! ह्यातूनच त्याच्या अंतर्मनातील तीव्र आर्त साद पहिल्याने प्रगटली. त्यातूनच त्याने जीवनातील विविध अनुभूतिंचे आकंठ प्राशन केले. त्यानेच त्याच्या (मानवाच्या) जीवनात अर्थ ओतप्रोत भरले. शब्दात आकाशाचा गुण आहे. चित्ताकाशाला महदाकाशाशी जोडण्याचे सामर्थ्यही त्यातच आहे. ॐ हेच त्या पूर्णपुरुषाचे, सर्वोत्तम, सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे बीजनाम! आणि ॐ हेच जीवात्म्याचे जीवनाचे आलंबन! **''एतद् आलंबनम् श्रेष्ठम्, एतद् आलंबनम् परम्, एतद् आलंबनम् ज्ञात्वा, ब्रह्मलोके महीयते।''** (कठोपनिषद् १ व २, मं. १७) अशा ह्या ॐकाराच्या सर्वात्मकतेने भारावून गेलेले आणि सतत याची जाणीव बाळगणारे ''श्री साईबाबा''! उद्याच्या काळात ॐकाराची जाणीव बाळगणारे वेदावर आधारित असे तत्वज्ञान जगाला सांगणारे कोणीतरी निर्माण होईल. ह्या अखिल विश्वाला प्रकाशाचा जीवनोपयोगी मार्ग दाखविल आणि मानवी जीवन त्याने बहरून निघेल, डंवरून निघेल असे अंर्तज्ञानाने व प्रगट विश्वासाने सांगणारे ''श्री साईबाबा''! म्हणूनच शिर्डीचा सुवर्णकलश बसविण्याकरिता प. पू. डॉ. रामचंद्र पारनेरकर महाराज ह्यासारख्या महान् संतगुरुला श्री साईबाबांच्या दृष्टान्त आज्ञेने पाचारण करण्यांत आले. ''पूर्णवाद'' ह्या तत्वज्ञानाचे प्रणेते डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकर महाराज यांचे हस्ते शिर्डीचा सुवर्णकलश बसविण्यात आला. ॐकाराची जाणीव बाळगणारे, वेदावर आधारित पूर्णात्मक असेच त्यांचे तत्वज्ञान होते. जणू काय ह्या तत्वज्ञानाचा कळसच श्री साईबाबांनी आपल्या मस्तकी धारण करून त्याला तेजाळून काढले. ही गोष्ट दसऱ्याचा दिवस, १९५२ मधील. डॉ. पी. एल. पवार, सिव्हील सर्जन, नगर. हे त्यांचेबरोबर कळससमारंभ प्रसंगी अगदी शिखरापर्यंत गेले होते. सदरहू लेखिका ही त्यांचीच कन्या! प. पू. रामचंद्र पारनेरकर महाराजांची शिष्या!

त्यानंतर एवढा दीर्घ काळ लोटला. आणि.......

१९८४ साली अतिशय विलक्षण अशी एक महत्वपूर्ण घटना घडली. ''श्री साईबाबांचा एक दिव्य साक्षात्कार माझ्या जीवनाला विलक्षण कलाटणी देणारा एक सुवर्णक्षण, एक दिव्य अलौकिक क्षण ठरला. तो दिवस २९ नोव्हेंबर १९८४ हा होता. दत्तनवरात्रीच्या स्थापनेचा दिवस असून 'गुरुवार' होता.

नित्यनियमाने आज गेली दोन तपे दरगुरुवारची मध्यान्हकाळाची आरती अगदी

बाबांपुढे उभे राहून, टाळ वाजवून, अत्यंत मनोभावे मोठ्या उल्हसित अंत:करणाने, आनंदपूर्वक मी करत आले आहे. अनेक लहान मोठे साक्षात्कार श्री साईकृपेने मी अनुभविले आहेत. वयाचे १२ वे वर्षीच प. पू. रामचंद्र महाराजाकडून उपासना घेतली. तरी ही पूजा मी करतच होते. श्री साईबाबांना मी बालपणापासून प्रत्यक्ष परमेश्वर समजून, श्री व्यंकटेश ह्या उपास्य देवतेचे स्वरूप मानूनच पुजले आहे. त्या दिवशी दुपारच्या मुहूर्तावर श्री. एस. एम. जावडेकर ह्यांच्या पुतणीचे लग्न असल्याने मध्यान्हकाळच्या आरतीस मी दुपारी ३ च्या सुमारास सुरुवात केली. श्री साईबाबांची आरती करून नंतर प. पू. रामचंद्र महाराजांच्या आरतीस मी प्रारंभ केला. आरती चालू असतानाच एकाएकी छातीत जोराची कळ आली. थोड्या वेळाने ती थांबेल असे वाटले परंतु ती थांबण्याऐवजी अधिकच वाढू लागली. घाम तर इतका फुटू लागला की नॅपकीनने पुसला तरी राहीना. शेवटी परकराने मी घाम पुसू लागले. पण नंतर तेवढेही वाकणे जमेना. आता तर डावा हात व खांदाही दुखू लागला. अगदी क्षणभरही श्वास घेणे जमेना. आपले मरण समीप येऊन ठाकले आहे ह्याची जाणीव झाली. मग कशाचाही विचार न करता समोरच्या (देवघरातील पूजेत मांडलेल्या) ''श्रीसाईसतचरित्र'' ह्या पोथीवर श्री साईसमाधीची कल्पना करून विश्वासपूर्वक डोके टेकले. दोन्ही हातांनी अक्षरश: श्री साईचरण मानून घट्ट कवटाळले व मनानेच बोलले ''देवा आजपर्यंत तुझी होईल तशी मनोभावे सेवा केली आता सर्व तुझ्या पायाशी समर्पण! तुझ्या पायाशी जागा दे, तुझ्या स्वरूपी लीन करून घे.'' आता दुसऱ्याच क्षणी आपण मरणार ह्या कल्पनेत मी असतानाच ज्या ठिकाणी श्री साईबाबांचा फोटो होता तेथून एक हलकासा झोत माझ्यापर्यंत वेगाने आला व स्पष्ट शब्द ऐकू आले ''मी साईबाबा बोलतोय. ह्या क्षणी तुझे मरण होते परंतु हे आयुष्य तुला एवढ्याचसाठी देण्यात येत आहे की ह्यापुढील आयुष्य तू पारनेरकर महाराजांच्या कार्यासाठी वाहून घ्यावे. (हे म्हणत असताना आज ज्या ठिकाणी प. पू. रामचंद्र महाराजांची मूर्ति असलेले मंदीर आहे ती जागा त्यावेळी रिकामी होती व प. पू. रामचंद्र महाराज असे दाखविण्यात आले.) ह्यावर मग माझ्या संसाराचे काय असा मी प्रश्न केला असता त्यावर प्रपंच आणि परमार्थ हे हातात हात घालून जातात हे तर तुमचे तत्वज्ञान आहे असे परत श्री साईबाबाकडून सांगण्यात आले. त्यानंतर मात्र ठीक आहे मी जरूर तसे करीत असे सांगताच सर्व वेदना, घाम इ. सर्व विरून गेल्या. जाई जुईचा सुगंध दरवळू लागला. हळूवार गारवा सर्वत्र पसरला. विपरीणामरहित असे हलके फुलके तरल वातावरण निर्माण झाले व परत शब्द आले ''श्री व्यंकटेश, साईबाबा व पारनेरकर महाराज सर्व एकच आहेत. तुला कधीही मरण येणार नाही. तू अमर आहेस. कोणीही तुला मारू शकणार नाही. एकच एक ईश्वराचा

र्वत्र वास आहे.'' त्या शब्दासरशी त्या एकत्त्वाचा अनुभव देण्यासाठी माझी काया विरल विरल होत गेली. मी महान होत होत महाकाय बनले. ह्यापुढचा अनुभव एकत्वाची अनुभूति देणारा, ब्रह्मानुभूतिची सार्वदेशिक व्याप्ती दाखविणारा होता तर नंतर सर्व आनंद देहातच स्थिरावून तो आत्मानंदाची हृदयदेशी अनुभूति देणारा दिव्य अलौकिक असा अनुभव होता. नि:संशय, नि:संदेह, निश्चिंत स्वरुपाचा होता. ''फिटले मन संशय, तुटले सारे मोह, जडो तुझे रुप, एक देवा। देई निरंतर सौख्याचा हा ठेवा, दृष्य मम जीवनी तूच व्हावा।'' असा आत्यंतिक जिव्हाळ्याचा हृद्य, न भूतो न भविष्यति असा अनुभव=तो! परंतु ह्या ठिकाणी मी त्याचे वर्णन करू इच्छित नाही. ते वर्णन करण्यास माझे शब्द, माझी लेखणी असमर्थ आहे. त्या अवर्णनीयाचे वर्णन कसे करणार? त्या अनुपमेयाला कशाची उपमा देऊ? त्या अरुपाचे रुप कसे चित्रित करू? अशब्दाला कुठले शब्द साकार करू शकतील? त्या अमर्यादाला कुठल्या मर्यादांनी मर्यादित करता येईल? ते ह्या सर्वांच्या पलीकडील आहे. परंतु ह्या एवढ्याशा देहात कैवल्याचा, आनंदाचा चैतन्याचा तो महासागर कोंदला जात होता व त्याच्या कृपेनेच तो पेलला जात होता. निर्भय जीवनाचे वरदान मिळत होता.

आणि नेमके गुरुवारीच श्री साईलीला मासिकाच्या संपादकांचे पत्र ह्या मासिकासाठी लिखाण करण्याबाबतचे आले. मला तर जणू काय स्वर्गच गवसला. ज्या श्री साईबाबांनी मला प. पू. रामचंद्र महाराजांचे कार्य करण्याची आज्ञा केली, जीवनभर जीवन सार्थकी लावणारे महान् परमपवित्र कार्य करण्यास सांगितले त्याच बाबांच्या श्री साईलीलेसाठी प. पू. पारनेरकर महाराजांच्या तत्वज्ञानावर आधारीत लेखमाला 'महिला विश्वात' शब्दरुपाने साकार करण्याचे हे कार्य जगाला सामान्य वाटले तरी मला ते असामान्य, अलौकिक व अतिमोलाचे वाटल्यास नवल काय? त्यांचीच शक्ति, त्यांचीच प्रेरणा त्यांच्या कृपेने ह्या लिखाणासाठी स्त्रवो ही प्रार्थना करून श्रींचे चरणी सादर समर्पण।

---

**यथा हि कुरुते राजा प्रजास्तमनुवर्तते।।**

**- रामायण ७/४३/१९**

**राजा जें वर्तन करितो, त्याचें अनुकरण प्रजा करितात.**

---

युधिष्ठिर उवाच–

**किमेकं दैवतं लोके किं वाप्येकं परायणम्।**
**स्तुवन्तः कं कमर्चन्तः प्राप्नुयुर्मानवाः शुभम्॥२॥**

पद–

किम्, एकम्, दैवतम्, लोके, किम् वा, अपि, एकम्, परायणम्।
स्तुवन्तः, कम्, कम्, अर्चन्तः, प्राप्नुयुः, मानवाः शुभम्॥

अर्थ–

युधिष्ठिर विचारताहेत–

"या जगात असा कोणता एकमेव देव आहे? अथवा अंतिमतः कोणते स्थान आहे? कोणाचे भजन-पूजन केले असता मानवाचे कल्याण होईल?"

भीष्मपितामहांना धर्मराज प्रश्न विचारत आहेत. या जगात असे कोणते दैवत 'एकमेव' म्हणता येईल असे आहे? ज्याच्या आज्ञेने हे सर्व विश्व चालते, कर्मप्रवृत्ति होते, सर्व प्राणिमात्र जगतात असा एकच एक देव कोणता असा पहिला प्रश्न विचारलेला आहे. अनेकांनी अनेक देव सांगितलेले आहेत तेव्हां त्यांतील एकच देव कोणता असा प्रश्न युधिष्ठिरापुढें आहे. या जगात प्रवेश केल्यावर शेवटीं माणसाला कोठें जायचे आहे हा त्या नंतरचा प्रश्न आहे. 'परायण' याचा अर्थ जाण्याचे ठिकाण. माणूस शेवटीं कोठें जाण्याची इच्छा करतो तर ज्या ठिकाणीं गेल्यावर परत यायला नको, जे शाश्वत म्हणजे कायम टिकणारे आहे, जिथे आनंदरूप मोक्ष आहे, जन्म-मरणाची दगदग नाहीं, अशा स्थानाची माणसाला अपेक्षा आहे. ज्याची प्राप्ति झाली कीं त्यावाचून दुसरें कांहीच उरत नाहीं असे कोणते स्थान असू शकते? मुण्डकोपनिषदाने म्हटले आहे की–

**ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति। ३.२.६**

'ब्रह्म जाणणारा ब्रह्मस्वरूपच होतो' त्याला स्वतंत्र अस्तित्व शिल्लक उरत नाहीं. मुंडकोपनिषदात त्या स्थानाचे अतिशय सुंदर वर्णनही केलेले आहे–

**भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यन्ते सर्वसंशयाः।**

**क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे।।२.२.८**

त्या परावराचे (परमात्म्याचे) एकदा दर्शन झाले अर्थात असें दर्शन ज्ञान दृष्टीने होणार–असे झाले कीं मनुष्याची अविद्यारूपी हृदयग्रंथी भेदली जाते, सर्व संशय नाहीस होतात, सगळ्या तऱ्हेची कर्म-कर्तव्ये क्षीण होतात. अर्थात् क्षीण होणे याचा अर्थ कर्तव्य संपते असे नाही तर त्याचा बडेजाव नष्ट होतो. माणूस जन्माला आल्यापासून मरेपर्यंत जगत असतो म्हणजेच जगण्याचे प्राथमिक कर्त्तव्य त्याला पार पाडावेच लागते. त्यापासून सुटका नाहीं. फक्त त्याची जाणीव ठेवून वागायचे असा याचा अभिप्राय आहे. संशयाला जागा रहात नाहीं. करावे कीं न करावे असा संभ्रम उरत नाहीं. जे वाटयाला येईल ते निष्ठेने करणे हेच त्याच्यापुढें शिल्लक राहते. निर्भय अंत:करणानें तो आपली कर्त्तव्ये बजावीत असतो. याशिवाय दुसरा मार्गच नसतो–'नान्य: पन्था विद्यतेऽयनाय' असें श्वेताश्वतर उपनिषदांत (६.१५) सांगितलेले आहे. तेव्हा हें असे एकुलते एक जाण्यासारखे ठिकाण कोणते हा प्रश्न धर्मराजाने उपस्थित केला आहे.

ज्याचे गुणगान गावे, भजन-पूजन करावे, नाना तऱ्हेने भक्ति करावी असे कोणते दैवत आहे? हे सर्व माणूस आत्मकल्याणाकरिता करीत असल्याने तसें लाभण्याची निश्चिती या पुढच्या दोन प्रश्नात विचारलेली आहे. वस्तुत: महर्षि व्यासांनी धर्मराजाच्या रूपानेच जणू हे मानवी जीवनाला भेडसावणारे प्रश्न उपस्थित केले आहेत. प्रत्येक माणूस हा आपण काय करावे, कशाकरितां करावे या संभ्रमात असतो. आपले चांगले कशामुळें होणार हा त्याचा न सुटणारा प्रश्न आहे. संशयाने पछाडलेला व फलाबद्दल शाश्वती नसलेला प्रत्येक माणूस हा प्रश्न विचारीत असतो. स्वत:शी विचारतो अन्यथा दुसऱ्या माणसाला तो विचारतो. वास्तविक बाबांना हा प्रश्न उकरून काढण्याचे कारण नव्हते परंतु सत्पुरुषांचे अंत:करण माऊलीसारखे असते. आई जशी मुलाला काय हवे-नको ते ओळखून न विचारता देते तसे बाबांनी शामाच्या रूपाने सर्वांना उपयोगी पडेल अशी बहुगुणी विष्णुसहस्रनामाची मात्रा आपणहून दिली.

(क्रमश:)

# संत नामदेव

- सौ. प्रविणा कांबळी,
मानद सहाय्यक कार्यकारी संपादिका

महाराष्ट्र भूमीला संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, जनाबाई, मुक्ताबाई आदि संतांनी पूण्यभूमि बनविलें. विठ्ठलाच्या चरणीं लीन होऊन त्याच्यावरील अपूर्व आणि अलोट प्रेमानें युक्त अशी वाङ्मय रचना करून मराठी भाषेचें एक दालन अतिशय समृद्ध करून सोडलें. त्यांनी केलेली अभंग रचना म्हणजे मराठी भाषेला लाभलेलीं सुंदर लेणीच.

अशा या पार्श्वभूमिवर भागवत धर्माची पताका दऱ्याखोऱ्यांतून फिरवून थेट पंजाबपर्यंत नेण्याचें कार्य करणारा महान संत म्हणजे नामदेव होय. शिखांच्या 'ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथात त्यांची एकसष्ट पदें समाविष्ट असून ती 'भक्त नामदेवजीकी मुखवानी' म्हणून प्रसिद्ध आहेत.

संत नामदेवाचा जन्म शके ११९२ मध्यें पंढरपुरांत विठ्ठलभक्त आईबापांच्या पोटीं झाला. मातापित्यांच्या भक्तिचें बीज नामदेवांत उतरलें. बीज अंकुरलें, रोप वाढलें आणि नामदेव विठोबाचें आजन्म एकनिष्ठ भक्त होऊन राहिले. प्रपंचाकडे पाठ फिरवून, मनीं विठ्ठलनामाचा छंद व हातीं टाळ-दिंडी घेऊन अहोरात्र राऊळीं नाचणाऱ्या आपल्या मुलाची स्थिती आईला पाहावत नसे. त्याची आई गोणाई त्याला परोपरिनें विनवायची, "नाम्या हें देवपिसें सोड, देव हा घरघेणा आहे. त्याला जे भजतात ते संसाराला मुकतात. स्वरूप दाखवून तद्रुप करणाऱ्या या विठ्ठलाचा संग तूं सोडून दे व संसाराकडे लक्ष दे." नामदेवाची बायको राजाई तर दैन्यावस्थेंत मोठ्या कुटुंबाचा प्रपंच चालवतां चालवतां मेटाकुटीस यायची, म्हणायची

**"लावोनि लंगोटी, जाले ती गोसावी**
**आमुची ठेवाठेवी कोण करी?**

त्याच्या आईनें व बायकोनें नामदेवाचें लक्ष संसारांत लागावें म्हणून खूप प्रयत्न केले पण नामदेव विठ्ठलाच्या भक्तिंत पूर्ण रंगले होते.

अवघी पंढरीच आपल्या मनमानसीं सामावून, रात्रंदिवस तन्मयतेनें पांडुरंगाची आळवणी चाललेली असायची. सुंदर पाटोळा वस्त्र परिधान केलेले, गळ्यांत वैजयंती माळा घातलेले आणि कानी कुंडलें ल्यालेल्या त्या केशीराजाचें साजिरे रूपदर्शन घेण्यासाठीं नामदेवाचे नेत्र आसुसलेले असायचे. पांडुरंग त्यांची आई व स्वत: त्यांचा

तान्हा बाळ समजून परमेश्वराची आळवणी व्हायची त्यांच्याशीं लाडी गोडी चालायची.

**तूं माझी माऊली मी वो तुझा तान्हा।**
**पाजीं प्रेम पान्हा पांडुरंगे।।**
**तूं माझी माऊली मी तुझें वासरूं।**
**नको पान्हा चोरूं पांडुरंगे।।**
**तूं माझी हरिणी मी तुझें पाडस।**
**तोडी भवपाश पांडुरंगे।।**
**तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज।**
**चारा घाली मज पांडुरंगे।।**
**नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ।**
**मार्गे पुढें उभा सांभाळिसी।।**

## ज्ञानदेव नामदेव भेट

या दोघांची भेट शके १२१३ च्या सुमारास आळंदी मुक्कामीं झाली. एक ज्ञानियांचा राजा व दुसरा भक्तश्रेष्ठ असा एकमेकांचा बोलबाला दोघांनाही ज्ञात होता. स्वत:च्या अपूर्व भक्तिचा अहंकार सुरुवातीला नामदेवांच्या मनांत होता. ज्ञानदेवांना मी काय म्हणून नमस्कार करावा असे त्यांच्या मनांत आलें.

**काय वंदू याचे चरण। अंगे परब्रह्म मजपाशीं।।**

असे म्हणून ज्ञानेश्वरांना नमस्कार न करतां ते स्तब्धच राहिले. मुळांतच परखड स्वभाव असलेली मुक्ताबाई नामदेवांना म्हणाली

**अखंड जयाला देवाचा शेजार। काय अहंकार गेला नाहीं।**
**परब्रह्मासंगे नित्य तुझा खेळ। आंधळ्या डोहळे कां वाजाले।**
**कल्पतरूतळवटीं इच्छिल्या त्या गोष्टी। अद्यापि नरोटी राहिली का।।**

मुक्ताबाईनें गोराबा कुंभाराकडून नामदेवाला कांहीं अनुभवाचे प्रश्न विचारून नामदेवाची भक्ति कशी अनुभवशून्य व ज्ञानविरहित आहे हें लक्षांत आणून दिलें. नामदेवांना स्वत:च्या अहंकाराची जाणीव झाली. मुक्ताबाईनें त्यांना निगुरा म्हणून कच्चें मडकें ठरविलें. सद्‌गुरुला शरण जाण्याचा आदेश त्यांना झाला. त्याप्रमाणे ते ज्ञानदेवांचे शिष्य विसोबा खेचर यांना शरण गेले. विसोबांनीं त्यांच्यावर कृपा करून देवाचें खरें स्वरूप त्यांच्या अनुभवास आणून दिलें.

पंढरीचा विठोबा आपल्याशीं बोलतो चालतो अशा भ्रमांत असलेल्या

नामदेवाची भक्ति डोळस झाली. सद्‌गुरु कृपेनें नामा परब्रह्म पक्वान्न जेवला.

भूतळींचीं तीर्थें नामदेवांचा सहवास घेत तीं पाहावींत असें ज्ञानदेवांच्या मनांत आलें. त्यांनीं आपला विचार नामदेवांना बोलून दाखविला. नामदेव म्हणाले, 'त्रिभूवनींचे वैभव दूर सारून मी पंढरीचा भिकारी झालों आहे. विठोबाच्या पायीं कल्पतरूची छाया आणि कामधेनूचें दुभतें मी अनुभवीत असतांना तीर्थयात्रा कोणासाठीं व कां म्हणून करायची.' ज्ञानदेवांनीं नामदेवाचा विठ्ठलाप्रतीं असलेला भाव पाहून त्याला हृदयांसीं धरलें. देवाकडून निवाडा करून घेण्यासाठीं ते राऊळांत विठ्ठल भेटीसाठी आले, पंढरीनाथ हंसून म्हणाले, "नामदेवा, सबाह्य निर्मळ व स्फटिकवत असलेले ज्ञानदेव तुझ्या संगतीचे भुकेले आहेत. प्रत्यक्ष परब्रह्म मूर्तिच असे ज्ञानदेव तुझा संग इच्छितात तरी तूं त्यांच्याबरोबर अवश्य जा." पांडुरंगाला भक्तश्रेष्ठ नामदेवाची कोण काळजी. ते ज्ञानेश्वराला म्हणतात, "माझें भोळेभाबडें नामयें तुम्हीं वाटेंत मागेंपुढें लक्ष ठेऊन नीट सांभाळून घेऊन जावें. त्याची तहानभूक जाणावी व रानींवनीं कोठेंहीं त्यास विसवूं नये."

नामदेवांनीं ज्ञानदेवांचे चरित्र लिहिलें, 'आदि, समाधी आणि तीर्थावळी' अशा तीन प्रकरणांतून ज्ञानदेवांच्या भावंडासहित ज्ञानदेवाचें अतिशय आत्मीयतेनें जणूं चरित्र गायिलें तेंहि सत्याचा विपर्यास न करतां.

ज्ञानेश्वरांबद्दल नामदेवांना कोण आत्मीयता आणि आदर. ज्ञानमाऊलीबद्दल ते म्हणतात.

**ज्ञानराज माझी योग्यांची माऊली। जेणें निगमवल्ली प्रगट केली।।**
**गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी। ब्रह्मांदलहरी प्रगट केली।।**
**अध्यायविद्येचें दाविलेंसें रूप। चैतन्याचा दीप उजळिला।।**
**छप्पन्न भाषेचा केलासे गौरव। भवार्णवीं नाव उभारीली।।**
**श्रवणाचें मिषें बैसावें येऊनी। साम्राज्य भुवनीं सुखी नांदे।।**
**नामा म्हरे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओंवी अनुभवावी।।**

## नामदेवाचा स्वानुभव

देह जावो अथवा राहो. देवाचे पाय मी कधींच सोडणार नाहीं. हे दिव्यचरण मी हृदयाशीं निरंतर धरून राहीन. केशीराजाची ती सांवळी श्रीमूर्ती हृदयांत भिनतांच त्यांची देहबुद्धी पालटली. लोकलाज मावळली. आशातृष्णा निमाल्या व नामदेवांना सहज विश्रांती घडली. आत्मानंदाच्या आनंदांत राऊळीं तन्मयतेनें नाचत असतां त्यांना आत्मतेजाचा अनुभव आला. कोटी सूर्याची प्रभादीप्ति आकाशांत झळकावी त्याप्रमाणें

देवाचें तेजोमय दर्शन घडलें आणि नामदेव धन्य झाले.

आपल्या साक्षात्कारानें कृतकृत्य झालेल्या नामदेवांस सर्वत्र देवदर्शनाची दिवाळी अनुभवास आली व मीच माझा देव व मीच माझा भक्त अशी त्यांची स्थिति होऊन गेली.

# जाते माहेराला

जाते माहेराला। जाते माहेराला॥
साई माऊलीला। जाते भेटायला॥१॥
सुखाचे निधान। भक्तांचे भूषण॥
साईचे चरण। जाते पहायाला॥२॥
आनंदले मन। जाहले उन्मन॥
अंतर्बाह्य दिसे। साई दयाघन॥३॥
समाधी मंदीर। साईचे सुंदर॥
क्षणभर तेथे। जाते विसाव्याला॥४॥
आनंदी आनंद। राहिला भरोनी॥
सुफलीत झाले। सर्व मनोरथ॥५॥

– मनोरमा पी. दीक्षित, मुंबई.

## सरस्वतीच्या काठावरती .....

आमच्याकडे अनेकदा ग्रंथ, पुस्तके इत्यादी साहित्य साईभक्त व अन्य पाठवीत असतात. त्यांचा संपूर्ण परिचय करून देणे जागेअभावी शक्य होत नसते. तथापि त्यांचा संक्षेपाने परिचय व पोहोच देण्याचे ठरविले आहे.

पुस्तक अथवा साहित्यकृति पाठवितांना त्याच्या दोन प्रती पाठवाव्यात. 'सरस्वतीच्या काठावरती' या नवीन सदरात या साहित्याचा अल्प आस्वाद प्रसिद्ध करण्यांत येईल.

- कार्यकारी संपादक

# हरिः ॐ बाबा

साईबाबांचे भक्त श्री. पांडुरंग शंकरराव भुजबळ उर्फ श्री साईरंग महाराज, सातारा, यांचे आत्मचरित्र "हरिः ॐ बाबा" या नावाने ६ जून, १९९० रोजी प्रकाशित झाले.

ह्या आत्मचरित्रास प्राचार्य शिवाजीराव भोसले, एम्.ए., एल्.एल्.बी., कुलगुरु, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी अतिशय हृद्य प्रस्तावना लिहिली असून त्यात त्यांनी हे आत्मचरित्र हे प्रांजल व पारदर्शक असे आत्मकथन असून सत्याचे प्रयोग साध्या सरळ भाषेत मांडले आहेत असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

पुस्तक मिळण्याचे ठिकाण– गोरखनाथ मसूरकर<br>
ब/११८/७, सरकारी वसाहत, बांद्रा (पूर्व),<br>
मुंबई-४०० ०५१.

पुस्तकाची किंमत रु. ४५/-

## साईकृपेच्या सावलीत...१

श्री साईबाबांनी असंख्य भक्तांवर कृपा करून त्यांच्या मनोकामना पूर्ण केल्या व 'माझी समाधी पावेल' असा वरही देऊन ठेवला. त्यामुळें अगणित भक्त साईबाबांच्या समाधि-दर्शनाने पावन होऊन कृतकृत्य होतात. त्यांचे मनोरथ सिद्धीस जातात. श्री साईलीला मासिकाकडे असें अनुभव भक्तगण सतत लिहून पाठवीत असतात. कांही निवडक अनुभवांचा दरवर्षी विशेषांकही काढत असतो. तथापि असें असंख्य अनुभव आमचेकडे सतत येत असल्याने त्या अनुभवकृपेची माहिती इतर भक्तांना व्हावी म्हणून 'साईकृपेच्या सावलीत' असे स्वतंत्र सदर सुरु करीत आहोत.

या सदराकरितां वाचक-भक्तांनी आपले अनुभव ५० ते १०० शब्दांपर्यंत थोडक्यात मुद्देसूद लिहून पाठवावेत. कागदाच्या एका बाजूस समास सोडून सुवाच्य अक्षरात असे कृपानुभव पाठविल्यास त्याला या सदरांत प्रसिद्धी देण्यात येईल. जागेच्या मर्यादेमुळें सर्वच अनुभवांना प्रसिद्धी देणे शक्य होणार नाही तथापि वैशिष्ट्यपूर्ण अनुभवांचे संकलन या सदरांत देण्यात येईल.

**- कार्यकारी संपादक**

माझी मुलगी बी.कॉम. च्या शेवटच्या वर्गाला असताना परिक्षेच्या आधी दोन महिने एकाएकी आज़ारी पडली. डॉक्टरनी अभ्यास करायला मना केले. ती अभ्यास कसा करणार व परिक्षेला बसून पास कशी होणार या चिंतेत असताना श्री साईबाबांची मनोभावे प्रार्थना करून उदी लावली. मुलगी चांगले गुण मिळवून पास झाली व तिला नोकरीहि लागली.

दुसऱ्या प्रसंगांत माझ्या यजमानांना घरापासून थोड्याच अंतरावर एका गाडीने धडक दिली. मला ही बातमी कळताच धक्का बसला. बाबांचे स्मरण करीत मी तेथे पोहोचले. अर्थात मांडीला मार बसण्यावर निभावले होते. बाबांच्या कृपेने ते पूर्णतया बरे झाले.

**- सौ. स्मिता विनायक देवरूखकर,** दहिसर.

मी मंत्रालयात आमच्या एका सहकाऱ्याला बँकेतील कर्जासाठी जामिन राहीले. त्या घटनेला वर्ष झाले मी ते विसरूनहि गेले. अचानक बँकेची कर्जवसुलीची नोटीस माझ्या नावे आली. सदर गृहस्थाने हप्ते न भरल्याने मला नोटीस आली. रक्कम बरीच मोठी असल्याने मी अतिशय चिंतेत पडले. रक्कम मोठी असल्याने माझ्या आवाक्याबाहेर

होते. मोठ्या मुष्किलीने त्या गृहस्थाच्या घरी आम्ही जावून आलो. त्याने आपण फार हलाखीच्या परिस्थितीत आहोत असे सांगितले. मला तर काही सुचेना. शेवटी मी बाबांना शरण गेले व या संकटातून सोडविण्याची प्रार्थना केली. काळजीमुळें मी रजाहि घेतली. रजेहून परत ऑफीसमध्ये आल्यावर आम्ही अतिशय बारकाईने बँकेच्या रेकॉर्डची तपासणी केली असता असे कळले की मी ज्या कर्जाला जामिन राहीले होते ते कर्ज केव्हाच फिटून गेले होते. नोयीस मिलालेल्या कर्जाला मी जामिन नव्हते. बँकेच्या नजरचुकीमुळे हे सर्व झाले.'' भिऊ नको मी तुझ्या पाठीशी आहे'' या बाबांच्या उक्तीचा मला प्रत्यय आला.

**- सौ. शुभांगी गंधे,** कांदिवली.

माझ्या आईची प्रकृति एकदा अचानक बिघडली. मी घरातील सर्वात मोठी. सहज आईने हाक मारली म्हणून आढेवेढे घेत आईच्या खोलीत शिरले. पहाते तो आईची शुद्ध हरपत होती. मी घाबरून पपांना व बाकीच्यांना हाक मारली. आई कोणाच्याच हाकेला प्रतिसाद देत नव्हती. हतबल अवस्थेत व्याकुळ होवून बाबांची प्रार्थना करून आईला बरे वाटावे म्हणून मनोमन प्रार्थना केली. बाबांनी प्रार्थना ऐकली कारण प्रार्थनेनंतर काही वेळाने आई शुद्धीवर यायला लागली आणि तिला संपूर्ण बरे वाटले. श्री साईनाथांच्या कृपेची नजर माझ्या सदैव स्मरणात राह्यली.

**- सौ. संध्या पाटील,** कॅलिफोर्निया, यु.एस.ए.

आम्ही शंकराच्या दर्शनाला मंदिरात प्रवेश करीत होतो. त्यानंतरचे पुढचे मला काहीच आठवले नाही. माझे यजमान काहीतरी बोलत असताना मी शुद्धीवर आलेली होते. त्यांनी सांगितले की मंदिरात मला अस्वस्थ वाटू लागले बाहेर रस्त्यावर आल्यावर मी बेशुद्ध पडले. टॅक्सी करून मला घरी आणले गेले. डॉक्टरांनी वेळ कठीण आहे. मी ईलाज करतो पुढे ईश्वरेच्छा असे सांगितले. हे ऐकून माझ्या यजमानांनी साईबाबांचा फोटो माझ्या उशीखाली ठेवून त्यांचा धावा सुरु केला. मी शुद्धीत आल्यानंतर मला आठवले की मी शंकराचे दर्शन घेत असता तेथे बाबाच दिसले. त्यांच्या कृपेचा अनुभव आम्हांस प्रत्यक्षच आला.

**- सौ. सुधाताई चैतन्य,** इंदोर.

अशाच तऱ्हेचे साईकृपेचे अनुभव सौ. रेखा महाजन, वसई., सौ. सुचेता हजरनीस, ठाणे., सुमन देशपांडे, हलियाळ., श्री. दिनेश हेळेकर, रत्नागिरी., सौ. दिपा फळसणकर, बोरिवली., श्री. बाळगोंडा पाटील, धामणे., सौ. वंदना पारकर, तळेबाजार., श्री. शशिकांत निकाळजे, वरळी., सौ. प्रिया परब, कल्याण., यांनी अनुभवलेले आहेत.

## हितगुज

जून ९० चा अंक वाचत असता (पान २८) भारावल्यासारखे होऊन हृदय गलबलून आले. यापूर्वी असा अनुभव पोथी वाचत असताना एकदा आला होता. डोळे अश्रुंनी न्हावून मन हलके झाले. अंकाच्या पवित्रतेचा व साईसहवासाचा अनुभव आला याचे श्रेय साईकृपेने आपणासच आहे. अंकाची वाट पाहत असतो.

**श्री. दिपक वसंत गळीतकर**
पिंपळे सौदागर, पुणे.

साईलीलेचे अंक अत्यल्प किमतीत भक्तांना उपलब्ध करून त्याद्वारे साईबाबांच्या श्रद्धा व सबूरी या संदेशाचे प्रसार साहित्य उत्तमरित्या संस्थान देत आहे.

**श्री. बाबू तुळशीराम गोरठेकर**
नायगांव-बाजार.

जून ९० चा अंक साईज्ञानाने परिपूर्ण व विलोभनीय वाटला. बाबांचे मुखपृष्ठ नेत्रदीपक होते. साईज्ञानरूपी निर्मळ जल पिवून हृदयकमळ प्रफुल्लित झाले. साईलीला अंक म्हणजे ज्ञानांनी अथांग भरलेल्या व भक्तांच्या श्रद्धारूपी कमळांनी बहरलेले सरोवरच होय.

**श्री. मिलींद धोंगडे**
नागपूर.

साईलीलाचा मे ९० चा अंक हाती आला. आनंद वाटला. अंकाचे स्वरुप थोडे बदलू लागले आहे. त्याबाबत लिहिणे होईल.

**श्री. श्री. भि. ताटके**
ठाकूरद्वार, मुंबई.

जून ९० चा अंक हाती आला. आयुर्वेदाची माहिती हा उपक्रम फार चांगला आहे.

सौ. प्रविणा कांबळी यांनी लिहिलेला 'नामस्मरण' हा लेख फार चांगला वाटला. भक्तीचा सोपा मार्ग त्यानी थोडक्यात मांडला आहे.

संपादकीय मध्ये ऋग्वेदातील मंगलाचरण क्रमशः देणार आहात हा नवीन उपक्रम फार म्हणजे फारच चांगला आहे. आपल्या कारकिर्दीत असेच अध्यात्मात भर घालणारे

उपक्रम चालू करावे ही अपेक्षा.

**श्री. दा. प. पाटील**
पालघर, ठाणे.

आम्ही अंकाची सतत वाट पहात असतो. कारण अंक हे अमृत आहे. त्याशिवाय आम्हाला चैन पडत नाही. श्री. चकोर आजगांवकर, कर्नल निंबाळकर, अंतोन शायर फर्नांडिस, अनिल रसाळ, यांचे अध्यात्मावर लिखाण अतिसुंदर आहे. त्यातून मार्ग मिळतोय.

**श्री. हरिश्चंद्र गो. पाटील**
दहिसर, मुंबई.

जून ९० अंकामधील 'दिव्य जीवनाकडे', 'नामस्मरण', 'नादब्रह्म' फारच वाचनीय आहेत. अंकाची प्रगति वृद्धिंगत होवो. उत्तम दर्जेदार लिखाण भक्तांना वाचावयास मिळावे ही श्री बाबांचे चरणी विनम्र प्रार्थना.

**श्री. गुरुनाथ विष्णु पन्हाळकर**
कोल्हापूर.

जून ९० चा अंक फारच अनमोल वाटला. अंक वाचताना मनाचा टवटवीतपणा पुलकीत होवून मन शांत होते. तसेच आरोग्यासंबंधीचे सदर फारच उत्तम आहे. साईलीला मासिकामुळे साईबाबांचे अस्तित्त्व घरात सर्वत्र असल्यासारखे वाटते. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांना आवडणारे एकमेव मासिक फक्त श्री साईलीला मासिकच होय.

**श्री. एस्. एन्. वेर्लेकर**
ठाणे (पश्चिम).

जून ९० चा अंक मिळाला. नियोजित साईबाबा भक्त-निवासच्या भूमिपूजन समारंभाचे टिपलेले क्षण चित्रण श्री साईबाबा संस्थान शिरडी, यांच्या महान कार्याच्या घवघवीत यशाची पावती आहे. जून ९० मधील सर्वच लेख शब्दांनी ओथंबलेल्या भावनेने चिंब झालेले असून भावस्पर्शी आहेत. ज्ञानकण फुलासम उलगडून दाखविले आहेत.

**श्री. रामदास ग. पगारे**
नवापूर, धुळे.

साईलीलेची कौतुक करणारी पत्रे आमच्या पुढील साईभक्तांनी पाठविलेली आहेत. श्री. प्रभाकर गुप्ते, इंदूर., सौ. मीराबाई त्र्यंबक वाणी, जळगांव., श्री. एस्.

आर. काडगी, पुणे., श्री. आसाराम कदम, कोतूळ., श्री. यादवराव ढबाले, उमरेड., श्री. रविंद्र भालेराव, इचलकरंजी., श्री. पी. सी. गोडबोले, पुणे., श्री. बी. व्ही. अवसरे, तासगांव., श्री. शं. ल. अवधूत, जगदलपूर (बस्तर)., श्री. संतोष संखे (कोलवडे), सौ. सिंधु मुळीक (दुर्ग).

अंक उशिरा मिळाल्यामुळे पुढच्या महिन्यातील सण व्रतांची माहिती द्यावी अशी सूचना करणारी श्रीमती सुधा पोतकर, जोगेश्वरी., श्री. डी. पी. पाटील, आगरवाडी व श्री भगवान चांडक (वाशिम) यांची पत्रे आलेली आहेत. त्यांच्या या सूचनेचा स्वीकार केला आहे.

- कार्यकारी संपादक

अपरिहार्य कारणांमुळें श्री साईलीलेचे अंक आम्ही वेळेवर पाठवू शकलेलो नाहीं. अंक वेळेवर मिळावा म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत. साईभक्तवाचकांचे आम्ही दिलगीर आहोत.

**दुरुस्ती -**

ऑगष्ट ९० च्या अंकात पृष्ठ ८ आणि १३ वर 'उत्सवसमिति प्रमुख' असे छापलेले आहे. ते कृपया 'उपाध्यक्ष, उत्सवसमिति' असे वाचावे.

- कार्यकारी संपादक

# ऑक्टोबर १९९० - विशेष

| तारीख | वार | विशेष |
|---|---|---|
| १ | सोमवार | – पयोव्रत समाप्ति, द्विदल व्रतारंभ |
| २ | मंगळवार | – भौमप्रदोष, इद-ए-मिलाद |
| ३ | बुधवार | – कोजागिरी पौर्णिमा, शरद पौर्णिमा, अक्षक्रिडा, लक्ष्मी व इन्द्रपूजन |
| ४ | गुरुवार | – नवान्न-कुलधर्म पौर्णिमा, कार्तिकस्नानारंभ ज्येष्ठापत्यनीराजन, महर्षी वाल्मीकी जयंती, डाकोर मेळा, आथंबील ओळी प्रारंभ (जैन) |
| ६ | शुक्रवार | – भूमिपूजन |
| ७ | शनिवार | – संकष्ट चतुर्थी, करकचतुर्थी, दशरथ चतुर्थी |
| १० | बुधवार | – रवि चित्रानक्षत्रप्रवेश |
| ११ | गुरुवार | – कालाष्टमी |
| १४ | रविवार | – रमा एकादशी, गोवत्सद्वादशी, वसुबारस |
| १५ | सोमवार | – गुरुद्वादशी, वसुबारस |
| १६ | मंगळवार | – धनत्रयोदशी, भौमप्रदोष, धनतेरस, यमदीपदान, धन्वन्तरी जन्म, शिवरात्रि, ब्रह्मपूजा |
| १७ | बुधवार | – नरक चतुर्दशी, दीपावली, अभ्यंगस्नान, उल्कादर्शन, कावेरी संक्रमणस्नान, यमतर्पण, सूर्याचा तूळराशीत प्रवेश |
| १८ | गुरुवार | – लक्ष्मीपूजन, दीपावली, अभ्यंगस्नान, केदारगौरीव्रत, महावीरनिवार्णदिन, नक्तभोजन |
| १९ | शुक्रवार | – बलिप्रतिपदा, बलिपूजा, अभ्यंगस्नान, कार्तिक विक्रम संवत चित्रभानुनाम २०४७, महावीर जैन संवत् २५१७, गोवर्धन अन्नकूट, द्यूतक्रीडा, नारीनीराजन, वहीपूजन |
| २० | शनिवार | – यम द्वितीया, भाऊबीज, विश्वकर्मा दिन |
| २१ | रविवार | – रवि उस्सानी |
| २२ | सोमवार | – विनायक चतुर्थी |
| २३ | मंगळवार | – भारतीय कार्तिक, पाण्डवपंचमी |
| २४ | बुधवार | – रवी स्वातिनक्षत्रप्रवेश |
| २५ | गुरुवार | – सूर्यषष्ठी (चाट-विहार) |
| २६ | शुक्रवार | – कल्पादि |
| २७ | शनिवार | – गोपाष्टमी, दुर्गाष्टमी |
| २८ | रविवार | – कूष्मांडनवमी, कोहळादान जगद्धात्री पूजा, कृतयुगादि |
| २९ | सोमवार | – भीष्मपंचकव्रतारंभ |
| ३० | मंगळवार | – प्रबोधिनी एकादशी, पंढरपूरयात्रा, तुळसीविवाह |
| ३१ | बुधवार | – प्रदोष, प्रबोधनोत्सव, चातुर्मास्यसमाप्ति, तुळसीविवाह, मन्वादि, धात्रीभोजनारंभ, द्विदलव्रतसमाप्ति |